१२०१७८३९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ३२४
REFBK-0004479

ग्रं. सं. ठाणे
इतिहास
३२४

दप्तरांतून निवडलेले कागद

# १३

इतिहास ३२४

# मराठ्यांचा माळव्यांत प्रवेश

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

[ किमत— १० आणे किंवा १ शिलिंग १ पेन्स ]

REFBK-0004479

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१

*Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.*

## *BAJIRAO'S ENTRY INTO MALWA AND BUNDELKHAND, 1721-1730.*

The letters collected in this section will help the student to determine definitely some of Bajirao's movements and activities in Malwa, a subject which is still more or less vague. One of these letters mentions the help-mates of Bajirao in his northern conquests. Another mentions the chagrin of the Emperor upon learning of the capture of Dhar by the Marathas, Dhar being the key of Northern India. But evidently Bajirao could not push on his further conquests in 1724 as the return of the Nizam required his immediate presence in the South. The next two years, 1725-27, were spent in the Carnatic expedition and in facing other difficulties, created by the Nizam. Elaborate preparations were made after the Dussera of 1727 and large Maratha forces under commanders who were destined later to make a great name for themselves crossed the Nerbudda to check-mate the Nizam in Malwa. As the latter however made a sudden swoop southwards and threatened Poona, Bajirao left his main army to harass the northern borders of the Nerbudda, swerved suddenly to the south, and encountered the Nizam on the field of Palkhed not far from Aurangabad. The usual guerilla tactics did not avail the Marathas much, the Nizam being only arrested in his progress and compelled to accede to the two Maratha claims on the six subhas of the south agreed to previously by the Emperor in 1719. To gain time for more mature opposition he for some years continued a subtle and diplomatic campaign against Shahu.

The year 1728 was an Annus Mirabilis for the Maratha arms. While Bajirao was surrounding the Nizam in the south, some of his lieutenants in Malwa, acting on information received, planned a sudden coup. Not a moment was wasted ; mobilizing a strong army at Satara at the end of the monsoon both Bajirao and Chimaji took up the command of the expedition and proceeded, the former through Berar, Nagpur and the Central Province and the latter by the Western route through Khandesh and Nemad keeping full contact with each other. Chimaji's movements proved wonderfully quick. Having left Poona towards the end of October, he met Girdhar Bahadur, the Subha of Malwa, near Amzera and killed him in a bloodly encounter in which both parties fought heroically. Within less than a month Raja Girdhar's cousin and successor, the great Daya Bahadur, was overcome by Chimaji and put to death. These achievements at once struck terror in the heart of the Emperor and his government, convincing them that the Marathas had to be reckoned with. Bajirao at the same time proceeded by the Eastern route through Mandla into Bundelkhand wh[illegible] the Bundelas whole-heartedly welcomed him. The Bundelas, wh[illegible] carrying on a ceaseless struggle against the Empire, had fou[illegible] hemmed on all sides by the armies of Mahmudkhan Banga[illegible] Rohilla commander, and sorely needed help. Jaitpur, [illegible] the Bundelas, which had surrendered to the Rohilla genera[illegible]


jointly by the Marathas and the Bundelas and captured in April 1729. Mahmudkhan's army was completely disorganized, and retreated from Bundelkhand.

Thus within less than six months the Peshwa and his brother Chimaji pushed on practically to the banks of the Chambal and the Jumna threatening Delhi itself. It seems that Chimaji returned to the Deccan but Bajirao remained behind consolidating his conquests by personal influence and diplomacy. He cultivated amicable relations with Sawai Jaysing and respected the honoured heritage of the Rana of Udepur. But the hostile activities of Abhaysing of Marwar brought upon him the crushing hand of the conqueror. Next year Chimaji returned to Malwa and assuaged the feelings of the old Chhatrasal who had sought Maratha protection. These achievements not only established the reputation of the young Peshwa and his lieutenants on a sure foundation but replenished the coffers of the king at Satara convincing him that in any emergency the Peshwa and his brother could be safely relied upon.

These papers are important for another reason also. They clear up much of the haziness that hangs about the relations of the Marathas with the Empire in the first quarter of the 18th century. The details about Daya Bahadur, Girdhar Bahadur, Mahmudkhan Bangash and Raja Chhatrasal are for the first time established on an undisputable basis of time and place. It was up to this time believed that Raja Girdhar met his doom on the field of Sarangpur which was probably his base of operations. But the action in which he lost his life was fought at Amzera in the vicinity of Mandogad, while Daya Bahadur shared the same fate on that very field, although previously he was supposed to have fallen at Tirla which is not far away. The defeat of Bangash, which relieved the Bundela Raja Chhatrasal, is now definitely established to have taken place in the summer of 1729.

But the whole affair is not after all so simple as it appears. Raghuji Bhonsle and some of his colleagues are shown in these papers to be carrying their own plans independently of the Peshwa and evidently acting a part in these proceedings which requires to be further elucidated by fresh materials.

No. 43



Facsimile of the handwriting of Chimnaji Damodar Rajadnya

श्री

विनंती उपरी. आपण चिठी पाठविली की कूचमुकामाचा विचार लेहून पाठवणे. यैसियास रात्रौ रा बाबूरायासमागमे सांगोन पाठविले ते उतम आहे. माघील कामकाज, वोळी[१] मातबर आहे (त) त्याजवरींच आहे. मोहनावरी[२] जावे, त्याजवरी दबाव देऊन तेथील कामकाज होणे ते होऊन येईल. माघीलहि वसूल येईल, तोपावतो तेथेच मुकाम करावा. येथे पाणीहि नाहीं. पुढे पाणी आहे. अक्षत्रितीयेपरियेत मुकाम पडला तरी उतम आहे. कदाचित मुकाम करावयाचा विचार जाहला तरी आम्ही कूच करून गोरखोजी पाटील याचे ढालेपुढे[३] जाऊन राहून. हे विनंती. उतर पाठविले पाहिजे हे विनंती.

¶*This appears to be a reply to Bajirao's or Chimaji Appa's query how to co-ordinate the movements of troops.*

No. 2] [28.3.1724 ?

राजश्री पंतप्रधान

गोसावी यांचे सेवेसी

ꣳ श्रीमंत प्रौढप्रतापदिनकर खंडेस्वरी सदायेशवत राजमान्ये श्नो कंठाजी कदमराऊ दडंवत विनती. येथील क्षेम ताा छ १३ रजब मुकाम नर्मदातीर येथास्तित आसे विशश. गोसावियानी सेंधवाच्या मुकामीहून पत्रे पाठविली, ते आजी शनवारी प्राथकाली कुकसीच्या मुकामावर पावली. ते क्षणीच कूच करून नर्मदा उतरोन अलीकडे राहिलो. आजी पूर्णिमा, याजकारिता येथे मुकाम केला आहे. यावरी गोसावियाची आज्ञा येईल, त्याप्रमाणे वर्तनूक करून.

---

१ ओलीस घेतलेलीं मनुष्यें.

२ अलीमोहन = छोटा उदेपुर, बडोद्याचे पू. ४० मैल.

३ ढाल = निशाण. प्रत्येक सरदाराचे निरनिराळें निशाण असें. येथें भावार्थ गोरखोजी पाटलाच्या पथकाचा तळ पडला आहे तेथें जाऊं.

विदित जाले पाहिजे. फौज तयार करून छेबिनियांस बडवाणीभोवते पाठवितो. बहुत काये लिहिणे. कृपा वृधीते पावीत गेले पाहिजे.

प्राथकाली गणेशपंत सेवेसी पाठविले होते ते पावले असतील.

मोर्तब सुद.

० श्री ✓
मार्तंड चरणी दृढभाव
कमांजी सुत कंठाजी
कदमराव

¶*Kanthaji Kadam to Bajirao, informing the latter of his whereabouts, and requesting further orders.*

---

*No. 3*] [*9-5-1724 ?*

**श्री**

**राजेश्री पंतप्रधान**
**गोसावियाचे सेवेसी**

ꣳ श्रीमत् प्रौढप्रतापादिनकर खडेस्वरी सदायेशवत राजमान्य श्री कंठाजी कदमराऊ दंडवत विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशश. आपली आज्ञापत्रे आली की, नर्मदातीरी गांगली धरमपूरचे सुमारे भेटीस येणे. त्याजवरून यावयास विलंब नाही. आम्हास सनिध आहे. गोसावियाचा मुकाम कोणे स्थली आहे, तो कलत नाही. यास्तव पूर्वी राजश्री गंगाधरजी जमेनीस सेवेसी पाठविले आहेत. सांप्रत हरकारे व जासूदहि पाठविले आहेत. तरी कोणे ठिकाणी मुकाम आहे, आम्ही कोठे यावे, ते आज्ञा केली पाहिजे. आम्ही आलीस[२] आहो. पवार व पिलाजी गायेकवाड मोहनापलीकडे येका मजलीवर आहेत. गोसावियाची पत्रे आलियावर, आम्ही कूच करून गांगली धरमपुरीच्या रोखे यावे, तरी आपला मुकाम कोठे आहे, हे तहकीक[३] वर्तमान नाही, याकरिता सेवेसी लिहिले आहे. आज्ञापत्रे ये (ती) ल [येथें शिक्का] त्याप्रमाणे वर्तणूक करून. विदित जाले * * उजणीहूण कासीद आला. त्यास नवाब (नि) जामनमुल्क यांचे वर्तमान उजणीपलीकडे दो मजलीवर आले, म्हणऊन तहकीक वर्तमान आहे. मागून

---

१ सैन्याभोंवतालचा रात्रपाहरा.
२ अलीमोहन.
३ पक्कें, नक्की.
* शिक्का अस्पष्ट आहे.

नवाब हैदरकुलीखान याचीहि फौज येत आहे, म्हणऊन तहकीक वर्तमान आले. रोहिल्यांची[१] फौज नवलाई बदनुरांवर उजणीआलीकडे दो मजलीवर आहे. हे वर्तमान गोसावियास कळावे, म्हणऊन लिहिले असे. बहुत काये लिहिणे. कृपा वृधीते पावीत गेले पाहिजे. हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Kanthaji Kadamrao to Bajirao, informing the latter of the writer's movements and of those of other Sardars and the Nizam. Obviously Kanthaji and Bajirao are not far from each other. Bajirao from the itinerary printed by Wad crossed the Nerbudda about 9th May 1724.*

---

*No.* 4] [पो *3-9-1724?*

पो छ २९ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे सेवेसी

विनंती. धारेचा किला घेतला म्हणोन पृथ्वीपती सक्रोध होऊन खानदौराचे पुत्र समसामुद्दौलास व अजमखान यांसी पांच हजार रुपये रोज करून व सवाईजीस सात हजार रुपये रोज द्यावेंसा करार करून आज्ञा केली कीं तुम्ही उभयेतां गनीमास तंबी करून चमेल उतरों न देणें. दिल्लीच्या बाहेर समसामुद्दौलानीं डेरे केले, तेहि सत्वरींच सवाईजीस सामील होणार. सेवेसी श्रुत व्हावें म्हणून लिहिलें असें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे. हें विज्ञाप्ति.

¶*The Peshwa is informed (probably by Mahadeo Hingne from Delhi) of the Emperor's chagrin on learning that the fortress of Dhar had been captured by the Marathas. The Emperor thereupon ordered Sham Sam-ud-Daula and Jaysing to oppose the Marathas and prevent them from crossing the Chambal.*

---

१ बंगश ?

*No. 5*] [*4-3-1726*

(पत्र शाहू दप्तर रु. नं. १३ पंतप्रधान पुडकें.)

सुा सीत

## राजमंडळ

छ १० रजब. राजश्री केसो महादेव दिा रा पंतप्रधान यासी पत्र जे. तुम्ही विनंतीपत्र पाठविलें प्रविष्ट जाहालें. रा प्रधानपंतीं आपणास माळवेयांत पाठविलें, परंतु गिरधर बहादर सरदेशमुखी व चौथाईचा अंमल चालों देत नाहीं येविशीं त्यांनीं स्वामीस लिहिलें आहे. अंमल चालों देणें म्हणून त्यास लिहिलें आहे. याउपरी अंमल चालवितील. पत्र १

¶*Shahu's letter to Keso Mahadeo with reference to Girdhar Bahadur's interference with the collection of Maratha dues. The letter proves that Girdhar Bahadur was not killed before this time.*

---

*No. 6*] [*29-3-1726*

## श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे

शेवेसी

पोष्ये केशो माहादेऊ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा चैत्र शुध सतमी इंदुवासर मुाा चाचेरा प्रांत खिचीवाडा स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे विषेष. स्वामीपासून रा नारोपंत आले. यानी वर्तमान सागितलें. पत्रें पाठविली ते पावलीं. स्वामीचे आज्ञेवरून राजश्री दयाबाहादुराची गाठी तोडून येक्यामते आवघेजण निघालो. स्वामीकडे यावे हा विचार केला होता. (त्या उपरी) * * येऊन पकारपूर्वक येकत्रता जाले. राजश्री कृष्णाजीपंत येकत्र होऊन, विचार केला की, बुंदीकोट्याकडे जावें. च्यार दिवस पोट भरावें. हा निश्चये करून या प्रांते आले. येथून बुधीकोट्याकडे * * * * * * अतिशय केला की, राजश्री तात्या स्वामीकडे जाऊ. परंतु कोणाच्या चितास न आले. राजश्री रघोजी भोसले व आम्ही येकत्र होतो. त्याच्या चितांतील भावार्थ कलो आला. येदंनिमित्य आम्ही विभक्त जालो. लोक आम्ही कर्जेवामें करून ठेविले होते ते त्याकडे राहिले. आम्हापासी थोडेबहुत आहेत. जाले वर्तमान स्वामीस श्रुत होवे

म्हणोन शेवेसी लिा आहे. भेटीनंतर सकल वृत निवेदन होईल. दोस्तमहमद याच्या वार्तिकोबराबर[१] पत्रे स्वामीकडील आली, परंतु आम्हास आपलें पत्र आलें नाही. आम्ही स्वामीचे पदरीचे आहो. स्थापित आहो. पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Keso Mahadeo to Ambajipant Tatya giving him news from the North.*

---

*No. 7]* *[29-3-1726*

श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे शेवेसी पोष्यें नारो त्रिमल साां नमस्कार विनंती. ताा चैत्र शुध सप्तमी स्वामीचे कृपादस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालो, ते मजल दरमजल सुंदरसीच्या मुकामी लस्करात आलो. यासी पत्रें दिल्ही. वर्तमान सांगितले. स्वामीकडे यावे हा निस्चय करून राा दयाबाहादुरापासून तजविजेने आवघेजण निघोन गाठी तोडिली. पुढें विचार सारेजणी केला की बुधीकोष्याकडे जावे. हा मनसबा करून त्या प्रांतास चालिले आहेत. आम्ही कितेक गोस्टी विचाराच्या सांगितल्या. परंतु येथे भर आणिकच! राजश्री केशोपंत व राा रघोजी भोसले विभक्त जाले. सारे लोक त्याबराबर राहिले आहेत. दाहा पाच फुट[२] सिलेदार याजबराबर आहेत. राजश्री राणोजी भोसल्याचे पाठीमागे राहिले आहेत. राा केशोपंताचा मामला आफ्तंतर[३] पडला. भेटीनंतर सकल वर्तमान निवेदन होईल. राा केशोपंतानी पत्र लिा आहे त्यावरून श्रृत होईल. बहुत काये लिहिणे ? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Naro Trimal to Ambaji Purandare, giving news of an expedition against Daya Bahadur.*

---

*No. 8]* *[About 16-6-1726*

श्री

राजश्री अंबाजीपंत गोसावी यांसी

सकलगुणालकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहांकित रघोजी भोसले दंडवत विनंती. येथील क्षेम जाणोन स्वकुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष.

---

१ जासुदाबरोबर. २ फुट = फिरकोळ.

३ अफतादार = बेवारसी.

राजश्री नारोपंताबरोबरी पत्र पाठविलें तें उतम समयी दयाबाहादुर यांचे लस्करांत प्रविष्ट होऊन लेखनार्थे परम सतोष जाहला. तेच समयीं तीर्थरूप राजश्री राणोजी बाबाचे येथें आम्ही जाऊन राजश्री कृष्णाजी हरी यांस बलाऊन आणून मथितार्थ आरंभिला. या उभयतांनी व राजश्री सयाजी गुजर व राजश्री दतोपंत याणी संमत दिधलें कीं येथून फुटोन विभक्त होऊन येक मजल माघारे सरोन राहावे आणि तेथून येक भला माणूस पुढे मार्गस्त करून मागून कूच दरकूच जाऊन सामील व्हावे यैसा निश्चये केला. त्यावरून त्यासमागमेच आम्हीहि बहादुराचा निरोप घेऊन माघारे सरोन येक मज (ल) (गेलो). दुसरे रोज आणिकहि येक मजल जाऊन तेथून मागे उलटोन जाऊन म्हणून करार केला आणि दुसरें मजलीस गेलियावरी यां चहू वर्गानी शकट[१]भेद करून आम्हाकडून केशो माहादेऊ यांस फोडून नेऊन कुली लस्करचे लोकांसहि फोडून नेलें आणि कूच करून चालिलें. तेव्हा थोडे बहुत * * * * * * * * ले त्यांस (आ) * * * * * चा विचा(रास) आणितां कोण्ही त[२]न न देत. अतिशये करून चालावे तरी समागमे परिवार. मार्गाचा निभाव जाहाला पाहिजे. यैसी अडचण. त्याहीमधे लोकांचे अंगेज[३]णी वगैरे हरयेक विचार करावा. त्यास हे * * * लोक यांस इज[४]तीचा नगं[५]ना(मोशी) (नाहीं). आमची तों तारांबल याणी इमान देऊन केली. यैसी अडचण चहूकडून जाहली. तेव्हां गोसावियांकडे यावयाची मसलत मोडली. आपला शब्द लागेल यास्तव हे वर्तमान कलावे म्हणून मुजरत वार्तिक सिध करून सूचनार्थ हे पत्र लिहिले असे. प्रस्तुत दोन महिने येणे राहिले. त्याहीमधे गोसावियांचे आगमन संनिध जाहलिया तेच क्षणी पांचपंचविसानसी येऊन सामील होऊन. नाही तरी दोन महिनियाने रुसिपर्वतास खामखा येतो. हरयेकविसी भरवसा आपलाच आहे. या प्रसंगी भेटी होती तरी आम्ही आपले कु[६]वतीमाफीक सेवा करून. राजश्री रायापाशी आमचा मज[७]रा होता, तो योग घडोन न आला. आम्ही यावयाची

---

१ कारस्तानी. २ तन देणे = छाती करणें.

३ पराक्रम. भावार्थ असा कीं, या अडचणींतच शिपायांना, जीव लावून लढण्याकरतां बक्षिसें कबूल करावीं लागतात तोहि खर्च पडतो.

४ व ५ अब्रूची, नांवलौकिकाची चाड नाहीं व ईर्षा नाहीं.

६ यथाशक्ति. ७ मुजरा.

1172

कोसीस[१] बहुतच केली परंतु घडोन न आले. ईस्वरगतीस येत्न नाही. येविसी बहुत काये लिहिणे. हर घडीस कागदींपत्री सांभाळ करीत असिले पाहिजे. कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

*¶Raghuji Bhonsle to Ambajipant, explaining to him how in consultation with his Sardars he divided his forces into four divisions and proceeded in four different directions. Further he expresses his regret at his inability to join the Peshwa.*

---

No. 9] [16-6-1726 ?

**श्रीभार्गवराम**

**श्रीमंत् राजश्री पंतप्रधान**
**स्वामीचे शेवेसी**

विनंती. सेवक कृष्णाजी हरी सां नमस्कार विनंती. येथील कुशल स्वामीचे कृपादृष्टीकरून ताा जेष्ट वद्य १३ पर्यंत मुाा सिनर येथास्थित असे विशेष. अंताजी सिवदेऊ याजबराबरी आज्ञापत्र आलें त्याजवरून फौज ठेऊन केसो माहादेऊ यास वराडप्रांते सामील जालों. केसो माहादेऊ व त्र्यंबक गंगाधर व जनाजी भोसले या त्रिवर्गाच्या भेटी जाल्या. त्यास केसो माहादेऊ याने रघोजी भोसले उभे केले कीं यांचे नांवें सिकारोखा करावा. आंम्ही आनमान केला की दरबारीहून जे आज्ञा आहे तेणेंप्रमाणें करणे. ते त्याच्या विचारास न ये. आति आग्रह कीं रघोजी भोसले यांचाच सिकारोखा करावा. अत्याग्रह देखोन व स्वामी शब्द लावितील म्हणोन मान्य करावे लागलें. वराड प्रांतीहून कूच करून खांडवे प्रांतें गेलों. त्या प्रांते दोन च्यार मुकाम जाले. कर्णाजी पाटील कोलादितकर नामी मातबर माणूस होता त्यास इमानप्रमाण देऊन लस्करांत आणिला. सिरसुदकर निंबाजी पाटील याच्या बोलें मध्यानरात्री केसो माहादेऊ, रघोजी भोसले याणी सिरछेद केला! या कार्यानिमित्य निंबाजी पाटिलापासून मबलग रुपये घेतले. या नष्टाईवरून त्याचा आपला बेबनाव जाला. राजश्री त्र्यंबक गंगाधर जनाजी भोसले आम्ही येकत्र होऊन राजश्री अंबाजीपंत तात्या यास सामील व्हावयास चालिलो. आकबरपुरावर नर्मदा उतरतीरी आम्ही राहिलों. दक्षणतीरी केसो माहादेऊ रघोजी भोसले राहिले. आम्हावर चालोन

---

१ प्रयत्न.

आलें. नदीमध्ये युध्यप्रसग आरंभिला. त्याणी नावेत जेजाला घालून फौज आमची उधलून काढिली. आमच्या तलपावेतो रघोजी येऊन पोहचला. स्वामीचे पुण्य आमचे पदरी समर्थ होतें. दाहापांचानसीच जे करावयाची ते (शर्थ किंवा कस्त) करून पराभवातें पाविले. नाहीतरी केसो माहादेऊ याणें बरेंच केलें होतें. दुसरे दिवसी रा फिरंगोजी सेलके व मानाजी वाघ व बहिरोपंत धायेगुडे बकानेरी होते ते फौजेनसी आम्हापासी आले. त्यांस नर्मदा उतरविले. मध्यस्त पडोन समजावीस करू लागले. परंतु कोण्या प्रकारें निकालावर न येत. मग फिरंगोजी सेलके, मानाजी वाघ याणी आम्हास आज्ञा दिधली कीं, तुमच्या विचारास येईल तिकडे तुम्ही जाणें, त्याच्या विचारास येईल तिकडे ते जातील. स्वामीच्या सनदापत्रा केसो माहादेऊ याजपासी होत्या त्या आम्हापासी न देत. आंम्ही मांडोगडचा घाट चढोन वरते गेलो. सवेच हेहि घाट चढोन वरते आलें. इंदुरांत फितूर केला. राजश्री सवाई संताजी भोसले खालते देवास प्रांते आले त्यास सामील होऊन आम्हास गाठावे ऐसा इत्यर्थ केला. कुसाजी गणेश राजश्री पिलाजी जाधवराऊ यांकडील इदूरचा कमाविसदार, आम्ही रा सवाई संताजी भोसले यांजकडे पाठविला होता. त्याचे लिहिले आले कीं उभयेताची फौज तुम्हावर येते तुम्ही लांब करणे. त्यावरून कूच करून नवलाई प्रांतें आलो. तेथून मजल दरमजल राजश्री अंबाजीपंत तात्याकडे जावें, याचा शह टालोन जावे याजकरितां धारेच्या किलेदारासी सख्य संपादून आठ रोज किलेनजीक राहिलो. तों इतकियात केसो माहादेऊ, रघोजी भोसले, सवाई संताजी भोसले यांजपासून फुटोन दयाबहादुरास सामील जाले. त्यास दयाबहादुराचे हरोले[१] होऊन राजश्री सवाई संताजी भोसले याजवर चालोन आले. रा सवाई संताजी भोसले धारेवर आम्हापासी येऊन गला पडोन सामील करून घेतलें कीं तुम्ही आंम्ही येकत्र होऊन स्वामीकार्ये करून च्यार दिवस मुलुकगिरी करून ऐसा आति आग्रहें करून घेऊन चालिले. बदनावर नवलाई प्रांते आलो, सवेच पाठीवर दयाबहादूर आला. अंतर सा कोसाचे उरले. झाडून जावे, लांब करावे, तरी भोसले यांचे बुनगे बहुत. निभाव न होये यास्तव त्यांजकडे भले माणूस पाठऊन सख्य संपादून च्यार दिवस सोहबत[२] द्यावी ऐसे केलें. दयाबाहादुराची आमची भेटी जालियावर मौजे जाब प्रा इंदूर येथे येक मास वेढा होता तेथील निर्गम करून, शाहाजापूर सारंगपूरप्रांते नदीवर हुताशनी केली. त्यास राजश्री अंबाजीपंत तात्याचे वर्तमान आलें कीं, मंदसोरावर आले. म्हणौन राजश्री जनाजी भोसले व रंगो विश्वनाथ पाठविले. रा जनाजी भोसले तेथेंच राहिले.

---

१ आघाडी. २ सोबत.

रंगोपंत फिरोन आले. साकल्य वर्तमान सांगितले. त्यावरून दयाबाहादुरा-पासून फुटोन लस्करास सामील व्हावे हा विचार करून निघालो. त्यास कलो न देतां ग्रहस्तानी बहादुराची बहीरंबुनगा[१] लुटिली. आम्हासी शफ़त केला कीं, राजश्री आंबाजीपंताकडे जातों. मजल दरमजल पुढें बुंदीकोट्याच्या रोखे चालिले. आम्हास फुटतां न ये यैसे वर्तमान जालें. बुंदीकोट्याकडे गेलों तिकडे रुपया मिलाला नाही. भोसले यांचे लस्कर अनिवार. रुपया पैदा होऊ ने दीत. पर्जिन्यकाल समीप आला. चहूकडून मोगलाच्या फौजा पाठीवर आल्या म्हणौन कूच दरकूच करून दिढा माहिन्या वराड प्रांतें दाखल जालों. कोठे रुपया मिलाला नाही. सिबंदीचा गवगवा बहुत जाला तो कोये[२] म्हणून ल्याहावा? बरखंदाजाचा व सिपाई लोकाचा अतिशये गवगवा जाला. वरपागेची घोडीपिढी देऊन कटकटा वारल्या. पागेची घोडी वारली. फौजेस नालबंदीबदल पर्जिन्य-काली पंधरा हजार रुपये कर्ज काढून नालबंदीस दिल्हे त्याचा येक रुपया उगवला नाही. ते कर्जे जटाधारियांची[३] त्याची धरणी येऊन बैसलीच आहे. हा श्रमाचा परिहार[४] कोठवर ल्याहावा? केसो माहादेऊ याने बरेच केलें. पूर्वीहि कर्जदार होतो, हालीहि कर्जदार केलें. मालवें प्रांते कोठे रुपया मिळाला नाही. आगर पलीकडेहि मिला[ला] नाही. यैसी तवाई[५] जाली. बरें; सर्वहि उर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री सवाई संताजी भोसले यास कितेक स्वामीचे होतेचे [हातेचे?] इमानप्रमाण देऊन दर्शनास आणिले. देऊलगावीहून ते स्वामीकडे आले. आम्ही सिंनरास आलों. निमित्य कीं समा(ग)मे बरखंदाज व कर्जदार यैशा कटकटा बहु(त), याकरितां याच्या समजाविशी करून वाटे ला(वावे), (आ)णि आम्ही स्वामीच्या दर्शनास यावे, (या)करिता इकडे येणे लागलें. राजश्री सवाई संताजी भोसले याजसमागमे केसो माहादेऊ आला आहे. त्यास कितेक लबाडी करितील. याकरितां शेवेसी विनंती लिहिली आहे. आम्ही आमावाशा जालियावरी येका दो रोजा मोहर्त आहे त्या मोहर्तेकरून स्वार होऊन भेटीस येतो. कितेक वर्तमान राजश्री जनाजी भोसले याणी सेवेसी निवेदन केलेच आसेल. आपणहि सत्वरीच येऊन पोहचतो. विदित जाले पाहिजे. सेवक पुरातन पदरीचे आहो. आमचे हाते सेवा वेऊन उर्जित करणार आम्हास स्वामीवाचून दुसरा कोण आहे? 'सुटले[६] केश पाठीस शरण.' विदित होये हे विज्ञाप्ति.

---

१ बुणुगबाजार, बाजारबुणगे.

२ किती

३ गोसावी सावकारांची.

४ विस्तार.

५ विपत्ति, दुर्दशा.

६ अनन्यशरण.

श्रीमंत राजश्री पंत आपा स्वामीचे शेवेसी सां नमस्कार विनंती. राजश्री पंतप्रधान स्वामीस पत्र लिहिले आहे त्यावरून विदित होईल. आपणहि सत्वरीच दर्शनास येतों. तरी आभिमान धरून सर्वस्वें आमचे ऊर्जित केलें पाहिजे. विशेष काये लिहिणे. आम्ही पदरीचे सेवक, कुटुंबी आहो. आमचे ऊर्जित करून सेवा घ्यावी (हे) स्वामीस उचित आहे. हे विज्ञप्ति.

¶*The writer Krishnaji Hari sends the Peshwa an account of his expedition into Malwa. He says he joined Keso Mahadeo's forces who involved him in all sorts of quarrels with Raghuji Bhonsle. He was then pursued into Malwa where Keso Mahadeo abandoning all scruples went over to Daya Bahadur, the Mogul Subedar, and threatened the Maratha army. Finding his position assailed Krishnaji Hari had the wisdom to strike an alliance with Daya Bahadur. He left Daya Bahadur's camp when news reached him that Ambajipant (Bajirao's general) was in the vicinity.*

---

*No. 10*] [17-8-1728

**श्री**

**श्रीसकलगुणालकरण आखडित-**
**लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री**
**बाजीराव पडित प्रधान व ता रा**
**चिमाजीपंत आपा स्वामी गोसावियासी,**

पोष्ये दादोराव भीमसेन कृतानेक नमस्कार विनती उपरी. येथील कुशल स्रावण वद्य अस्टमी जाणऊन स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशष. आपणाकडील वृत बहुत दिवस कळत नाही, तरी सदैव पत्री परामृश करीत गेले पाहिजे. सला जालियाच वर्तमान ऐकोन दोनी कासीद जोडी पाठविली त्यास च्यार महिने जाहाले, अद्यापि उतर न आले. पावले किवा न पावले हे न कळ. येथील वृ[त्त] तरी पूर्वी खोज्याचे लिहिल्यापुसिल्यावरी आलो. येथील प्रसग कोकी[1] व रोशन[1]-दौलापुढे शंढाचे थोडकेच चालते? पादशा तो यास पुसिल्यावाचून काही करीत नाहीत. सरबुलंदखानाचा प्रसंग त्यानी केला तो निर्फळ गेला, त्यामुळे शर-(मिंदे) आहेती. सेखजीस व केशवरायास पाठविले आहे. आम्हास उतर पाठविले (तरी) कोबू[2] पाहून कार्ये करीन. सोडीत नाही. आ(पले) समाधान असो देणे. सवाईजीचे वर्तमान तरी या कार्याचा सर्वस्व अभिमान धरिला आहे,

---

1 The Emperor's favourites.

२ संधि.

त्याचा तपशील राजश्री स्वामीच्या पत्रावरून कलो येईल. सैदाचे वर्तमान तरी जितके पादशाही बंदे तितके येकेकडे. यक पादशा येकेकड. कोटेयांत बसले असता तीन लक्ष रुा दरमाहा देत होते. मग गुजरातचे सुबेदारीची तजवीज केली. त्यास कमरुदीखानाने ते गोस्टी उडाऊन दिधली. मग पादशानी ग्वालेर व कालाबाग व धामोणी, जोरतलब हे खिजमत दिधली. सैदानी वीस पंचवीस हाजार स्वार ठेऊन मवासी[1] मारून तिकडील ठाणी बैसविली. ग्वालेरवालियाची कुमक सवाईजीनी केली होती, त्याचा मदतीस कांही फौज पाठविली होती. हे वर्तमान नजमुदीआलीखानानी ऐकोन येकायेकी येऊन त्याची फौज मारून तमाम ठाणी बैसविली. हे वर्तमान ऐकोन फौज फिरून आली. इतकियांत आम्ही या प्रसगी आलो. सैदाचेविशई साधक बाधक सांगून चितांत उभ[य] पक्षी किंत होता तो काढिला. याचे तरफने वस्त्रें घोडा येक भला माणूस पाठऊन शफतपूर्वक स्नह करून दिधला. मग सवाइजीनी सैदाविशई येकदोनिदा मुख्यास लिहिले की जरी निजामाच कार्य करण आहे, तरी हे काम सैदास सांगण. ते करितील. पादशानीराव जगराम विकील सवाईजीचा मातबर साहाजारी आहे. त्यास रुबरू बोलाऊन पुसिले कीं, याची सवाईजीनी काय तजवीज केली आहे? रावजगरामास सवाईजीनी तपसीलवार लिहिले होते. त्यानें सर्वहि निवेदन केले. त्यावरून सवाईजीस हुकूम येऊन पाहोचला आहे कीं सीघ्र येऊन पोहचणे. * र तमाम मारून काढिले. काही बाकी आहे ती अजमेरवरून जातील. फौजबंदी पंचवीस तीस हजार स्वार, रजपूत मनसबदार पंचवीस हजार स्वार नजमुदिअलीखानानी ठेवावा व वीस हजार तोफखाना. त्यास खर्चास पातशाहानी द्यावे. बाहेरंगे गुजरातचा सुबा, अंतरंग दक्षण. सवाईजीनी सैदाचा सर्वस्व अंगिकार केला आहे. हे कर्म स्वामीच्या भरवासियावर केले आहे. हिंदुस्तानात स्वामीचे मोठेसं नाव जहाले. माघहि मोठमोठे सरदार जाहले. (पण) यैसे कोण्हीहि केले नाही. सैदासी स्वामीचाच भरवसा आहे. हेहि येश स्वामीसच येते; तरी आपणहि सवाइजीस पत्र बरा भर भरून लिहिले पाहिजे कीं तुम्ही सैदाचा अभिमान धरून हा मनसुबा ठराविला हे गोष्टी बहुत उतम आहे. आपणहि ह्या गोष्टीस राजी आहों. येक पत्र "छेत्रसाल बुदेला त्यांसी बंगसासी लढाई आहे. दसरा जालियावरी आमच्या फौजा त्या प्रांतास येतील. तुमची कुमक होईल," म्हणून लिहिले पाहिजे. फौज आलिया त्याकडून खर्चासहि येईल. या कार्यानिमित्य घरच माणूस दुर्गदास यास पाठविले आहे. तो जबानी सांगता कळो येईल. सवाईजीनी आज्ञा केली आहे की तुमची फौज माळवियात

---

१ पुंड लोकांस.

जलदीने येते. तरी पादशा तुमचे जे मतालेंब[1] आहेती ते सर्वहि करून देतो. फौज माळव्यात येऊन धामधूम करी ते गोष्ट केली पाहिजे. सवाई जयसिंगजीच पत्र स्वामीच नावे पाठविले आहे. उत्तर समर्पक सीघ्र पाठविणे. हली सवाईजी-कडून येक काईत व आमचे तरफेने मोरोपत सैदाकडे रवाना जाहाले. या कार्यानिमित्त शीघ्रच येतील. आपणाहि नजमुदीअलिखानास बहुत समाधानपूर्वक लिहिले पाहिजे. खोजाचहि अजी उत्तर आले कीं "माहाराजास लेहून फौजा माळव्यांत व गुजरातेत येऊन सीघ्र करीत यैसे सीघ्र केले पाहिजे, म्हणजे तेच निमित्त करून सैदाची रवानगी करू. फौज माळव्यांत ये ते अगत्य केले पाहिजे" तैसेच खोजाने लिहिले आहे. हे गोस्टी अगत्य केली पाहिजे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Dado Bhimsen, who appears to be the Peshwa's agent at Delhi, writes to Bajirao news of the Emperor's Court and the plans of the various advisers of the Emperor to prevent the Marathas from crossing the Nerbudda. The writer urges Bajirao to cross the river and threaten Malwa, by taking the opportunity afforded by the operations in Bundelkhand between Chhatrasal and the Bangash. Sawai Jaysing is reported to be favouring Bajirao.*

---

No. 11] [1728 ?

श्री

राजश्री पिलाजी जाधव

दाजी गोसावियासी

.॥ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये

स्नो मानाजी वाग व निलो कृष्ण रामराम विनंती. येथील क्षेम जाणून राउलीं आपले स्वानंदवैभवलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आपण आम्हास माडी व तलाठीस ठेविले. बकानरचे ठाणे हवाला करून रा फिरंगोजी सेलकेची व अमची * व करून त्याची आमची गाठी घातली. त्यास त्याची वर्तणूक तो पाहिलेपासून आपणा ठावकी आहे यैसे असोन गाठी घालून दिल्ही. त्यास मावे रा निलोबा फौजेनसी राहिले होते ते येतील न येत, याकरिता आपली आज्ञा मान्य करून राहिलो तो सवेच तेहि अले. ते आपण मिलोन अवघे अजीवर गुदराण उपासपारणी करून आपला मार्ग लक्षीत आहो. परगणे तो उद्वश होते त्यास कौलकरार देऊन वसात केली. येकदोन मवास होते. त्याच्या भेटी घेऊन सरोदा[2] करून बंदोबस्ती केली. इदुरासहि पेगम लाऊन तेथीलहि

---

१ मुद्दे. २ स्नेह.

अनुसंधान आले होते. त्यास दयाबहादुर व संताजी भोसले इंदूरकर मंडलाई घेऊन जाबेवर आला त्यामुळे इदुरास जाणे जाहाले नाही व नवाब माडवचा तलाठीस आला होता त्याची भेटी घेतली. सरोदा केला. त्याने आपल्या अमीलास व तलाठीच्या जमीनदारास पत्र दिल्हे की बिलाकुसूर[१] याची चौथाई देणे म्हणून राजश्री तात्याच्या नावे पत्र घेतले आहे. आपण येथे ठेविल्यासारिखे येकनिस्ठेने राहून मुलकात वस्ती केली परंतु रुपयास दर्शण नाही. काठ्यासी (?) समंध पडला आहे. फौज अबाळली आहे. येविसी विस्तारे ल्याहावे तरी सर्व गोस्टीचा आमचा अभिमान आपणास आहे. कितक वर्तमान राजश्री तात्याचे पत्री लिहिले आहे त्यावरून कळो येईल. बहुत लिहिणे नलगे. हे विनंती. माडिवच्या नवाबाच्या चितात आहे की राजश्री तात्याची भेटी घ्यावी, सरोदा करावा यैसे आहे. तरी आपल्या चितास येईल तरी तैसेच उतर पाठविणे. त्यासारिखे नवाबाचा मुदा घेऊन आम्ही भेटी येऊन. तरी राजश्री तात्या व आपण याचा * * * * * * * * पाहिजे हे विनंती.

¶*Manaji Wag and Nilo Krishna to Pilaji Jadhao, who seems to be in Malwa. The writers appear to be his helpmates. The situation at Mandavgad and the movements of Daya Bahadur are described for the information of Pilaji Jadhao and Tatya (probably Ambaji Purandare).*

---

*No. 12]* *[27-9-1728 ?*

छ ४ रावल

श्री

पुरवणी श्रीमत् राजश्री
अपासाहेबाचे सेवेसी

विज्ञापना. साहेबी आज्ञा केली की आपले सविस्तर वर्तमान विनंतीपत्री लेहून पाठवणे. त्याजवरून सेवेसी लिहिले जाते जे. पूर्वील सविस्तर अर्थ सेवेसी श्रुत जालाच आहे. सांप्रत वराडप्रांतीहून देवगडच्या रानातून सिवणी छपारियाच्या रोखे, गढ्याच्या सरदेस गेलो. पुढे राजश्री इद्याजी सतकर मंडलियासी[२] पाठविले. आज्ञेप्रा। गढियाचा बदोबस्त करून फौज ताजी करावी, प्रसंगानरूप रा। भास्कर रामासी गांठी घालावी या उदेशात होतो. त्यास श्रीमंत् राजश्री पंतप्रधान साहेबी आज्ञापत्र सादर केले की, पत्रदरशनी माघारे येणे. त्याजवरून राजश्री सरलस्कर आम्ही माघारे कुर्हियापावेतो अलो. त्यास फौज

---

१ बिनहरकत. २ मंडलगांव.

भारी. येके जागा चारापाणी न मिले, म्हणऊन ते दो मजलीच्या अंतरियाने श्रीमंताकडे पुढे गेले. सेवकलोक बालापूरपरियंत येऊन श्रीमंताच्या सेवेसी विनंती पत्र लिहिले आहे. जैसी आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक केली जाईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This paper addressed to Chimaji Appa mentions Bajirao's expedition towards Gadha and Mandla to oppose Bhaskar Ram. Can this Bhaskar Ram be the Commander of Raghuji Bhosle who led expeditions into Bengal? This and the previous letters disclose movements on the part of Raghuji, hitherto unknown.*

---

*No. 13*] [*30-10-1728*

**श्री.**

चिरंजीव राजश्री चिमाजी यासी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ ७ रबिलाखर जाणून, तुम्ही आपणांकडील कुशलवृत लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र छ ५ रबिलाखरींचे पाठविले ते प्रविष्ट जाहाले. चाकणेचा (कोट) बांधावयाच्या प्रवाहात तूर्त न पडाव येसी लिहिले ते कलले. येसियास तुम्हा लिहिला विचार तो उतमच आहे. तूर्तवडी राहऊन राजश्री पिलाजी जाधवराऊ यास सांगून सला करवितों. पुढे विचारानरूप कर्तव्य तैसें करून; लोक आद्याप कोण्ही आले नाहीत म्हणून लिहिले, त्यास तमाम लोकास ताकीद करून लोक रवाना केले आहेत. तमाम तुम्हाजवल येऊन पोहचतील. गोरखोजी भापकर व देवकाते व सोलके वगैरे लोक रवाना केले. सत्वरीच तुम्हास सामील होतील. तुम्ही मजल दरमजल जाणे. थोराताकडे घोडी सिंद्याची व घाटगियाची आहेत, त्यासाठी येक दोन मुकामे करून घोडी आणवणे. त्यामध्ये दोन च्यार घोडी तुम्ही त्याचे समाधान हाताखाली घालणे. नासीक संगमनेर येथील बाबती जकातीच्या अमलास पवारानी व तुरुकताजखान याणी डोहणा[१] केला आहे. त्यास येक दोन मुकाम गंगेआलीकडे करून, तुरुकताजखान यास जे परगणे जाहाले आहेत (ते)तील अमल निटाऊन जाणे. जर अमल सुदामतप्रमाणे निटावेना तरी बेमुरवत घासदाणे घेणे. लोकास चिठ्या येथून होतात त्या कुल बार करून ठेवित जाणे. पथकें येतील त्याची गणती घेऊन, घोडेमाणूस पाहात जाणे. वरकड येथील वर्तमान तरी आम्ही नीरेच्या तीरास आलों. उदैक मुकाम कोळहाले पाा फलटण येथे होईल. पुढे मजल दरमजल

---

१ घोटाळा, घोळ.

जाऊन. राजश्री स्वामी,[1] माहाल[2] माघार येत तो, जेजुरी सासवड प्रांते राहाणार. पुढे होईल वर्तमान ते लिहून. तुम्हीं आपणांकडील वर्तमान निरंतर लिहीत जाणे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to his brother Chimaji Appa. The two have planned a distant expedition to realise ghasdana levies in order to pay off Shahu's debts incurred in the recent struggle with the Nizam.*

---

*No. 14*] [*29-11-1728*

**श्री**

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल मार्गसीर्ष सुध दशमी भृगुवार मुकाम का रा * * न प्रा कडेवलीत जाणून तुम्ही आपणाकडील वर्तमान लिहित जाणें. यानंतर तुम्हीं पुण्याहून स्वार जाहाल्यादारभ्य काही कागदपत्र पाठविला नाहीं याउपरी तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे. येथील वर्तमान तरी आम्ही सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेब यास तुलजापूरचे यात्रेस नेली होती. यात्रा जाहाली. राजश्री फत्तेसिंग भोसले व राजश्री संभुसिंग भेटीस आले. राजश्री दावलजी सोमवंसी सरलस्कर समागमेच होते. मातुश्रीस यात्रा करविल्यानंतर माघारे फिरून आलों. राजश्री स्वामीची भेट नात्यापुत्याजवल जाहली. श्रीमहादेवाचे दर्शन जाहालियावरी कूच करून नीरातीरास राजश्री आले. येक दुसरा मुकाम चफासष्टीस नीरेवर करून छ ४ जमादिलोवली कूच करून सातारियास चालले. आम्ही छ ५ जमादिलोवली राजश्रीची आज्ञा घेऊन कडेवळीत प्रांते आलो सरलस्कर समागमे आहेत. गंगातीरप्रांते बीडपाथरीकडे जात आहों. राजश्री सरलस्करच्या सरंजामात त्याचा अमल बैसऊन द्यावयाचा आहे. तो बैसऊन पुढे पोट भरावयास जिकडे जाणे तिकडे जाऊन. तुम्ही आपले वर्तमान निरंतर लिहीत जाणें. सारांश गोष्ट विचारेंकरून मनसबा करून कर्जाचा परिहार होऊन पोख्त मनसबा होये तें करणें. राजश्री पिलाजी जाधवराऊहि समागमे आहेत. तुम्हास कलावें यास्तव लिहिले आहें. तुम्ही गोलियातागाईत वर्तमान लिहिलें नाही. तरी वर्तमान वरचेवर पधरवडियांत अगर महिनियाचे महिन्या तरी लेहून

---

[1] शाहू तुळजापुरचे यात्रेहून बाजीरावासह गेला. [2] राण्या.

पाठवणें. लोभ असों दीजे हा आसीर्वाद. पैका बोलल्याप्रा लौकर साता-रियास रवाना करणे. तिकडे तात्यासहि पत्र पैकियाचे व आम्हाकडेहि लिहून पाठवणे. आम्ही वराडचे रोखे आहो. हे आसीर्वाद.

*¶Bajirao relates Shahu's movements to his brother Chimaji and asks him to procure money by any means at his disposal to pay the armies and to defray the debts of Shahu.*

---

*No. 15*]

[*9-12-1728*

पाो छ २१ जमादिलोवल मुाा उजनी
दोनप्रहर दिवस

**श्री**

**श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी**

बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल मार्गसीर्ष वद्य चतुर्थी इंदुवार मुकाम मौजे बोधेगाऊ टाकली पाा सेवगाऊ जाणून तुम्ही आपणाकडील कुशल वृत लिहित जाणे. यानंतर तुम्ही गेल्यादारभ्य काही कागद पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी साद्यंत वर्तमान लिहून पाठविणे. यानंतर सांप्रत आजीच वर्तमान आलें की तुमचे व गिरधर बाहादर याचे युध्य जाहाले. गिरधर बाहादर याजकडील कितेक सरदार व लोक मारून गिरधर बाहादर बुडविला. लस्कर लुटून खासा दस्त जाहाला म्हणून वर्तमान आले आहे. यैसियासी ये गोष्टीचे तत्वता वर्तमान काये आहे ते सविस्तर लिहून पाठविणे. जर हे गोष्ट जाहाली असिली तरी उज्जनी सुभ्याचा बंदोबस्त करून मग कोण्हीकडे पोट भरावयास असुंद्या[१] मुलकात जाऊन फौजेची उस्तवारी[२] करणे. उज्जनी शहरचाहि पैका बरा घेणे. लोक कोण कोण कैसे आहेत ते सविस्तर लिहून पाठवणे. पाटणकर तुम्हाकडे पाठविले आहेत ते पावले किंवा नाहीं हे लिहिणें. येथील वर्तमान तरी आम्हीं तुलजापुरास गेल्यावर राजश्री फतेसिंग भोसले यास भेटीस आणून, त्याचे समाधान करून राजश्री स्वामीच्या दर्शनांस आणिलें आणि आम्हीं राजश्रीची आज्ञा घेऊन कडेवलितांत आलों. राजश्री सिदोजीराऊ निबालकर याचेहि समाधान करून राजश्री स्वामीकडे जावयास सांगितले. ते सत्वरीच जातील. आम्हीं प्रस्तुत गंगथडीस आलों. राजश्री दावलजीराऊ सोमवंसी

१ निर्वेध, मोकळा, कौली नसलेला किंवा जेथें कोणी येऊन तसनस लुटालूट न केल्यामुळें जो सधन वा सपन्न राहिला आह असा.

२ फौज ताजीतवानी करणें.

सरलस्कर हे फौजेसहवर्तमान समागमे आहेत. पुढें जो मनसबा विचार होईल तो लिहून पाठऊन. +तुमचे संतोषाचे वर्तमान वरचेवर लिहित जाणे. आम्ही वराडाचे रोखे जात असो. फौज फिरे कर्ज मरे यैसा विचार करणे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji, giving him news of Fatesing Bhosle's reconciliation with Shahu and enquiring about the battle with Girdhar Bahadur.*

*Dayaram* — *Madhao Bahadur* alias *Chhabilaram*

*Girdhar Bahadur* (son of Dayaram)

*Daya Bahadur* (son of Madhao Bahadur)

*The last two were quickly despatched by Chimaji Appa in December 1728.*

---

*No. 16*] [*About 10-12-1728*
[*19-12-1728*

छ २८ जालोवल
मुा उजेन दोन प्रहर

**श्री**

**राजश्री चिमाजी आपा**
**गोसावी यासी**

श्रीमंत् अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्राो धनाजी ढमढेरे व सुभानजी सेलार रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. गिरधर बाहादर यास बुडऊन येश घेतले. हे वर्तमान संतोषाचे आलें. त्यावरून बहुत समाधान जाहाले. आपण येशश्वी आहेत. पुढेहि याच प्रकारे श्री येश देईल. सदैव पत्री परामर्श केला पाहिजे. बहुत काये लिहिणे. कृपा असो दीजे. हे विनंती[१].

¶*Dhanaji Dhamdhere from Bajirao's camp congratulates Chimaji upon his victory over Girdhar Bahadur.*

---

+ येथून अक्षर खुद्द बाजीरावाचें.

१ हें पत्र बाजीरावाच्या लष्करांतून लिहिलेलें आहे. कारण मागचें बाजीरावाचें पत्र ज्या कारकुनाच्या हातचें आहे त्याच कारकुनाच्या हातचें हेहिं पत्र आहे.

No. 17] [24-12-1728

श्री

श्रीमंत राजश्री चिमणाजी-
पंत आपा स्वामींचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। पौष शुध पंचमी मुा। कल्याण स्वामीचे कृपेकरून आमचे व या प्रांतीचे वर्तमान यथास्थित असे. यानंतर स्वामीनी संतोषाची आज्ञापत्रे पाठविलीं ती प्रविष्ट जालीं. तेथे लिहिले की दयाबाहादुर याणे चालोन येऊन बारी धरिली. मग आपण सख्ती करून युधप्रसंग बरा दाट जाला. दयाबहादुर व त्याचे सरदार ठार जाले. लुटून फना केला म्हणून लिहिलें, त्यावरून बहुत संतोश जाला. स्वामी पुन्यपुरुष, येशस्वी, श्रीची दया व वडिलांचे पुन्य समर्थ, यामुलेच यैसी येशे स्वामीचे पदरी पडतात. दयाबहादूर त्या प्रांते मोहोरा सामान्य नव्हता त्यासच मोडिला. याउपरी पृथ्वी स्वामीस वस्य आहे. याउपरी श्री कधीहि न्यून पडो देणार नाहीं. टक्या पैकियासहि काये उणे? याउपरी वरचेवर आपणाकडील संतोशवृत्त लेहून समाधान पावीत गेले पाहिजे. या प्रांतीचे वर्तमान तरी राजश्री [1] स्वामीची स्वारी लोहगडपरयेंत जाहाली, येक दिवस मुकाम करून गड पाहिला. संतोसी जाहले. प्रसंगोचित स्वामीच्या नावाकरितां आस्त्या[2] पदार्थे सेवा जाली. राजश्री दादोबा[3] प्रसंगी होते. विदित आसावे. वरकड कल्याण प्रांतीचे वर्तमान तरी फिरंगी अद्याप वलवल करितां राहात नाही. आम्हीहि सावधच आहों. परंतु ला(फौ?)जेने धास्त घेतली आहे. मुलूक गुदस्ता धामधुमेमुले वैरान पडिला. विदितच आहे. वरकड जुनरप्रांतीचे वर्तमान तरी स्वामीचा मुकाम पुणियांस आसता चाकणेची[4] गढी मुस्तेद[5] करावयास आज्ञा केली. बेलदार स्वार व प्यादे रा। केले. गढीचा पाया घालित्ये वेलेस येक युध जाहाले. त्याउपरी त्याउपरी सांप्रत रा। गोविंद कृष्ण यास रवाना केले त्याणी त्याणी च्यार पाचसे माणुसे व स्वार ठेऊन गढी डोई इतकी मुस्तेद केली. त्यास दीडकसे राऊत व च्यार पाचसे बरखंदाज चालोन गोविंदपंतावर आले. त्याणी बाहेर निघोन मारामार बरी दाट केली. चाकणकराचा येक घोडा व सरदार ठार जाहाला. पाच सातजण मुर्दे पडिले. पंचवीस माणूस जखमी जाले. आम्हाकडील येकजण ठार जाहाला. दोघे जखमी व येक घोडा जखमी जाहाला हे

१ शाहू महाराज. २ असलेल्या. ३ पुरंदरे.
४ चाकण हें मोगलाचें ठाणें होतं त्यामुळें मारामारीचा प्रसंग आला. ५ तयार.

वर्तमान. निबालकर वडमुल्या (?) हजार राऊत निवडक घेऊन चाकणेस आला. त्याणे वलवल बहुत केली. मग सावर[1] नव्हे पाहून गोविंदपंत बाहेर निघाले. मग त्याणे गढी जाया केली. दाहा बारा गांव मारिले. गुरे ढोरे मवेसी[2] नेली. पुन्हा मागती जमाव आणखी ठेऊन गढी तयार करावयाचे प्रेत्नांत असों. विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*Krishnarao Mahadev Chaskar to Chimaji Appa, congratulating him on his victory over Daya Bahadur and giving details of an engagement near Chakan and Shahu's visit to Lohgad.*

---

*No. 18*] *[25-12-1728*
*[30-3-1729*

छ १० रमजान

**श्री**

पुरवणी. चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपर. येथे कर्जदारियाची व दरमाहिच्या पैकियाची वोढ सातारियास आहे. त्यास तुम्ही तिकडे गेलियावर आधी यैवज साधेल तो हरयेत्ने पाठऊन देणे, म्हणून तुम्हास सांगितले. तुम्हीहि मान्य केले आहे. तदनुरूप यैवज जेथून[3] पाठवावा हे विवंचनत असाल, त्यास मार्ग दुर्घट, यैवज आला पाहिजे, हा कदाचित विचार प्राप्त होईल, तर केशवदास कुवरजी साहुकार औरंगाबादेस मातबर आहेत, याचे गुमास्ते उजनीस किसणजी साहुकार आहेत. त्यास केशोदास याचे पात्र (पत्र ?) पाठविले आहे. जर तुम्हास यैवज पाठवावयाचे कार्य लागले तर रा जगंनाथ नाईक याचा गुमास्ता बाबू यास उजनीस पाठऊन व केशवदास कुवरजी याचे पत्र पाठऊन, त्या गुमास्तियास बोलाऊन आपणाजवळ आणून, पैका त्याचे पदरी घालून, त्याची हुंडी करून पाठवणे. म्हणजे यैवज सातारियास वोढीच्या प्रयोजनास प्रविष्ट होईल. राजश्री कृष्णाजी नाईक जोसी याचा पैका बहुतच द्यावा आहे, त्यास मारनिलेकडील शामजी नाईक यास येथे ठेऊन घेतले आहे. तुम्हाबराबरी माहादाबा नाईक व बालमुकुंदजी हे दोघेजण आहेत त्याचे पदरी पैका घालून सुरक्षित पावे ते गोष्ट करणें. +पंनास साठ रुपयेपर्यंत घालणे. रोखात पावलियाचा जाब घेणे आगर तसलमातचा जाब घेणे. राजश्री स्वामीकडील पैकियासाठी कारकून व

---

१ धीर न पुरे सबब.
२ मालमत्ता.
३ जमवून.
+ येथून अक्षर बाजीरावाचें.

जमादार समागम आहेत, त्यास येक रुपायापर्यंत पैका देणे. जर, ईश्वरइच्छेने पैका फारसा (मिळाला) तरी त्या उभयताचे समाधान रक्षून, नेमस्त गोष्ट दरबारी सागेत यैसे करून ठेवणे. जिकडे पैका फारसा मिळेसा आसेल तिकडे जाणे. कर्जदार आधी वारणे. लोकास पैका फारसा न देणे. तनू[१] पोटाची मात्र राखणे. रा उदबास होळकरास विचारे करून रजावंद राखण. लोभ+ आसो दीजे. हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks for money from Chimaji Appa and instructs him how to send it.*

---

*No. 19*] [*25-12-1728?*
[*17-1-1729*

पो छ २७ जमादिलाखर
मुा कायीथे

**श्री**

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी

आसीर्वाद उपरी. सातारियाकडे ऐवज रवाना करावयाविसी लिहिले त्यास याखेरीज दुसरा निजध्यास नाहीं. सांप्रत उजेनीस आलो आहो. येथील बोली लागली आहे. नियेत जाहला नाही. येका दो दिवसी नियेत होईल तो लिहून व पैका अनकूल होईलसारीखा दिसतो. परंतु मार्गाचीच चिंता वाटते. वालखेड्यास पैका पावलियास सातारियास सुरक्षित पावले की काये येविसीची आज्ञा करावी म्हणून लिहिले, यैसियास सातारियाचे रवानगीची चिंता तुम्हाखेरीज कोणास असणार? मार्गाची चिंता वाटते म्हणून लिहिलें तरी केशोबादास कुवरजी औरंगाबादेस साहुकार मातबर आहेत ते आमचे भेटीस आले होते, त्याणी आपले पत्र किशोरदास गुमास्ता उजनीस आहे त्यास दिल्हे, ते तुम्हाकडे पाठविले आहें. रा. जगनाथ नाईक पुरंदरे याचा गुमास्ता बाबू तुम्हा समागमें आहे त्यास सांगून किशोरदार यास केशवदास * याचे पत्र दाखऊन त्याची हुंडी जे करावयाची ते करून औरंगाबादेस पाठवणे, म्हणजे पैका पावेल. त्या साहुकारास बोलाऊन त्याचे पदरी ऐवज घालाल त्याची पावती आपणाजवळ लिहून घेऊन औरंगाबादेची हुंडी करणें. दुसरी गोष्ट तुम्ही लिहिले आहे की वालखेडियास पैका पोहचल्यास सातारियास पावल कीं काये? तरी वालखेडियास आलियावरी सातारियास जावयाचे

---

१ जरूर आवश्यक तेवढाच पैसा खर्चणें. + अक्षर थोरल्या बाजीरावाचें.

अगाध काये आहे ? तेथेहि पैका आलियास सातारियास पावेल. त्याहिमध्ये तुम्हास दोहीतून जे अनकूल पडेल ते करणें. पैका जो पाठवाल त्याचे पत्र राजश्री अंबाजीपंत यांस सातारियास पाठवणे. लोभ+ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks Chimaji to send money by Hundi through Keshavdas Kuverji, the rich banker of Aurangabad, or via Walkhede.*

---

*No. 20*] *[25-12-1728 ?*
*[17-1-1729*

पौ छ १० रमजान

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी

आसीर्वाद उपरी. नंदलाल मंडलोई इंदूरकर याजकडे राजश्री अंबाजीपंताचे स्वारीबाबत रुपये ९५०० साडेनव हजार बाकी राहिले आहेत, तो यैवज रा जगंनाथ नाईक पुरधरे याजकडे देविला आहे. नंदलाल याचे कतबे व्याजसुधा रुपये द्यावे यैसे नाईकमारनिले जवळ आहेत. याणीही माणसे त्याजकडे बहुतदां पाठविली. देऊंदिलाऊ करून आजीपर्यंत रुपये दिल्हे नाहींत. त्यास हा मजकूर तुम्हास ठावकाच आहे व नाईकाचा गुमास्ता बाबू तुम्हासमागमे आहे तो तुम्हास स्मरण देतच असेल. जर नंदलालाकडील तहरह जाहा(ला) असिला तरी या रुपयाची विल्हे तुम्ही करून (घेत)लीच असेल. कदाचित या रुपयाची विल्हे जाहाली नसिली तरी त्याजपासून बेमुरवत व्याजसुधा रुपये घेऊन बाबूचे पदरी घालणें. तुम्ही तो हा यैवज उगविलाच असेल. तथापि स्मरणार्थ लिहिले आहे. लोभ+ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao to Chimaji : advises recovery of loan from Nandlal Mandloi.*

---

*No. 21*] *[25-12-1728*
*[17-1-1729*

पौ छ २७ जमादिलाखर

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. राजश्री अबाजीपंत याचे स्वारीबाबत नंदलाल मंडलोई यांजकडे रुपये साडेनव हजार बाकी राहिले

---

+ अक्षर बाजीरावाचें.

आहेत, तो यैवज जगंनाथ नाईक पुरंदरे यास देविला आहे. नाईक मारनिलेचे माणूस नंदलालाजवल बसले आहे. आद्याप रुपये त्याणी दिल्हे नाहींत. यैसियास त्याजला बरी ताकीद करून, सदरहू रुपये व्याजसुधा घेऊन, जगनाथ नाईक याचा गुमास्ता बाबू तेथे आहे, त्याचे पदरी घालणे. जगनाथ नाईक याचा पैका दिवाणात गुतला, यामुले हे वोढगस्त आहेत. यास्तव सदरहू यैवज व्याजसमेत यास पावल्याने याची वोढ वारेल. तरी त्यास ताकीद करून, याचा पैका पावता करून पावलियाचे वर्तमान लिहून पाठवणे. लोभ+ आसो दीजे. हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks for money to be sent from Mandloi.*

---

*No. 22*]

[*About 25-12-1728 ?*

[*17-1-1729*

पो छ २७ जमादिलाखर

**श्री**

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. राजश्री सरलस्कर व आपण गंगातीर प्रांते आलेस, वराडात जाणार, येसियास वराडात पैका मिलावयाचा ठाव दिसत नाही. इकडे आलियाने मनसबा उतम होईल. सलाबत या प्राते पडली आहे. इकडे यावे हे उतम आहे, तरी यावयाचे करावे म्हणून लिहिले ते कलले. येसियास मालवियातही पैका विषेश आहे येसा अर्थ नाहीं. तुम्हाबराबरी फौज तोलदार आणि हेंहि फौज तोलदार. दोही फौजास पैका तिकडे मिळून उस्तवारी होयेसारिखी दिसत नाही. यास्तव आम्ही चांदे देवगड बुंधेलखडचा मनसबा योजिला आहे तदानुरुप करून. तुम्ही तिकडे असुधे रान१ पैका मिले आणि उस्तवारी होयसारिखे पाहून जाणे आणि पैका मिलून कर्ज परिहार होये आणि लस्कर फिटे ते करणें. सारांश तिकडील मनसबियाचा विचार सर्व तुमचा तुम्हावरी आहे. जो तुम्हास उतम दिसेल व तो करून वर्तमान वरचेवरी लिहीत जाणें. रोहिल्याकडील व राणाजीकडील व सेदाकडील मजकूर लिहिला तो कलला. मुख्य गोष्ट तुमच्या व राजश्री उदाजी पवार याच्या विचारे पोख्ता मनसबा असेल तो करणे. उजनीची बोली जाहालियाखेरीज वरकड मुलकाची बोली होत नाहीं म्हणून लिहिले. येसियास मालवियाचा अर्थ तुम्हास पहिला लिहिला आहे. त्याप्रमाणे गिरधर बहादर याच्या जागिराचा पैका

---

+ पत्र थोरल्या बाजीरावाचें.

१ मोकळें रान.

अवघा जप्त करून वसूल घेणे. जो माहाल येईल तो वरचेवरी खंडीत जाणे. येकासाठी सारे तटावे ऐसे नाहीं. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao asks Chimaji to make exactions from Ujjain and the whole Subha of Malwa.*

---

*No. 23*] [*27-12-1728*
[*30-3-1729*

१० रमजान

**श्री**

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल पौष्य शुध अष्टमी शुक्रवार मुकाम नजीक वासीम कसबा जाणून तुम्ही आपणाकडील कुशल वर्तमान लिहीत जाणें विशेष. तुमची पत्रें छ ९ जमादिलौवलीची (३०-११-१७२८) आंबझिरे[१] येथील मुकामीची आली ती प्रविष्ट जाहाली. गिरधर बाहादर वहेमेकरून[२] युध्यास आला, त्याचे आपले युध्य बहुत जाहालें, निदान[३] त्यास सेनासहवर्तमान बुडऊन येश प्राप्त जाहालें, हे कितेक वर्तमान तपसिले लिहिलें ते कळलें. यैसियास शत्रू अभिमानेकरून युध्यास प्रवर्तला त्यास वडिलांचे व धण्याचे पुण्येकरून पराजये केला आणि येश संपादिलें यावरून बहुत समाधान जाहालें. श्री सदैव तुम्हांस याचप्रकारे येषश्वी करों व तुम्हीहि याचप्रकारे निरंतर आपणांकडील संतोषाचे वर्तमान लिहीत जाणें. गिरधरबाहादर यास बुडविल्यावर तुम्हीं पुढे उजनीकडे गेलेच असाल. त्यास विचारेकरून उजनीवरी दबाव घालून व गिरधर बाहादर याच्या कुल जागिरा बाद करून पोख्ता टका साधणें आणि कर्जाचा परिहार होये तें करणें. येथील वर्तमान तरी आम्ही व राजश्री दावलजीराऊ सोमवंसी सरलस्कर यैसे आवढेपर्यंत फौजसहवर्तमान आलो. पुढे बुंधेलखंडाकडे चाद्या देवगडावरून जावे यैसा विचार आहे. तिकडे आलियावरी तुम्हास लिहून पाठऊन. तुम्हीं आपणांकडील वर्तमान लिहीत जाणे. गिरधर बाहादर याचे युधी राजश्री उदाजी पवार याणी व हुजूरच्या पथकानी कस्त मेहनत बहुत केली म्हणून लिहिले. यैसियास पहिल्यापासून यैसीच असाधारण कर्मे करून येश संपादित आले आहेत. पुढेहि सर्वविसी भरोसा त्यांचाच आहे. तुम्हीं समस्तांची समाधाने करून पुढेहि स्वामीकार्य करून कीर्त संपादे ते केले पाहिजे. +आम्ही खाईमखाई गढे छत्रसालाचे

---

१ आमझरा = धारच्या नै. २० मैल.
२ आकसाने.
३ शेवटीं.
+ येथून दस्तुर बाजीराव.

मुलकांत जातच आहो. सरलस्कर दाहा हजार फौज व आमची च्यार हजार फौज यैसी आहे. वीसपंचवीस हजार घोडे होईल. भोसले कोणी सामील जाले तरी करून घेऊन. तुम्हास जे पत्र पाठवणे तरी तिकडे पाठवणे. लोभ असो दीजे हे विनंति.

छ १० रमजान मुा दाहोद दोन घडी रात्र.

¶*Bajirao congratulates Chimaji on his victory over Girdhar and advises him to be cautious about future plans.*

---

*No. 24*] [*28-12-1728*

पोा छ १० रमजान

श्री

पुरवणी चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. आजी छ ७ जादिलाखरी काा वासीम येथे मुकाम जाहाला. पुढे मजल दरमजल देवगडाकडे जात आहो. तुम्हास कलावे यास्तव लिहीले आहे. हाँ[+] आसीर्वाद. छ १० रमजान

¶*Bajirao writes to Chimaji from Wasim, mentioning his intention of going to Deogarh.*

---

*No. 25*] [*1-1-1729*

श्री

**श्रीमत राजश्री चिमणाजीपंत आपा स्वामीचे सेवेसी**

पोष्य मल्हार दादाजी साा नमस्कार विनंती. ताा छ ११ जमादिलाखरपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर आपण पुण्यामध्यें असता सिनरीहून राा गोपाळ त्र्यबक याणी देसमूख देसपांडी पाठऊन बहुत बर्जिदी[१] केली की गंगथडीप्रांते येणे. त्यावरून स्वार होऊन सिनरास आलो. दोन चार दिवस तेथे होतो. त्यानतर सांप्रत गंगातिरी आहो. इकडील कामकाज चाली लागले आहे. तुरुकताजखानाचा जिल्हा त्याचे अमील आहेत ते परम नष्ट आहेती. स्वामीच्या प्रतापे कार्यप्रयोजन होई(ल); चिंता काये आहे ? यानतर स्वामी सेनासमुदाये (सहवर्तमान) मालवे प्रांते स्वारीस गेले. त्यास दयाबाहादर

---

+ पत्र थोरल्या बाजीरावाचें

१ अत्याग्रह.

उजेनीचा सुभा चालोन आला. ते प्रसंगी युध्य जाले. दयाबहादर ठार जाला. तसेच मोठाले सरदार ठार होऊन सर्व फौज हस्तगत, हस्ती नगारे निशाणे तोफा सकल सरंजाम हस्तगत जाला हे संतोषाचे वर्तमान स्वामीने आपणास लिहिले त्यावरून परमसमाधन जाले, की प्रथम स्वारीस स्वामी गेले. वडिलाचे आसीर्वादे व माहाराज स्वामीच्या प्रतापे थोर येश पदरी पडिले. कीर्तिघोष दिगंती गेला! स्तुतिवाद आपण काये ल्याहावा? उतरोतर श्रीने यैसीच येशे द्यावी इतके इछित आहों. यानंतर पुण्यामध्ये स्वामीने वचन दिल्हे आहे, येंदा अधिकउणा तुम्हापासून टका घेतला त्याची चिंता न करणे. येसा शब्द दिल्हा आहे त्याचे स्मरण असो दिल्हे पाहिजे. मागील कर्ज पुण्यात पाच हजार घेतले ते व दामासी मागील कर्ज आहे त्यामध्ये देऊन म्हणून अभये दिले. त्या बहुताचे भाग्ये स्वामी येसस्वी जाले. उतरोतर स्वामीस टका पैका मिळतो. येसस्वी निरंतर आहा. आमचा आसीर्वाद आहे. विशेष काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री गणपतराऊ तथा रा। बाजीराऊ तथा रा। आयाबा तथा अंताजीपंत स्वामीस सा। नमस्कार. लि। परिसीजे. आमचे स्मरण येजमानास दिल्हे पाहिजे हे विनंती.

राजश्री बाजीस आसीर्वाद. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Malhar Dadaji (Barve) to Chimaji Appa, expressing his satisfaction on hearing of the success of the latter over Daya Bahadur. The writer reminds him of his promise to repay his debts.*

---

*No. 26*] [*2-1-1729*

**श्री**

**राजश्री चिमाजीपंत आपा गोसांवी**

**यांस**

ॐ सकलगुणालंकरण अखडितलक्ष्मीआलक्रुत राजमान्य श्री। दावलजीराव सोमवसी सरलस्कर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेश. आपण उजेनीचे मुकामीहून पत्र पाठविले तें प्रविस्ट होऊन लेखनार्थ कळो आला. दयाबहादूर फौजेनसी वहमियाने चालोन आले, त्याचे व आमचे फोजेचे दोन प्रहर युध्य जाले, दयाबहादूर ठार पडले, व वरकड मातबर येक दोघ सरदार त्यांकडील पडले, हती निशाणें नगारे

व घोडी पाडाव करून लुटून फना केला, धण्याचे व वडिलाचे पुण्ये फते जाली म्हणून युध्याचे वर्तमान तपसिले लिहिले, त्यावरून संतोशाच्या कोटी जाल्या. कस्त आपण सीमेपरती केली व महद् येश संपादिले. आपण येशस्वीच आहेत! याउपरी वरचेवरी सविस्तर वर्तमान आपणाकडील सदैव पत्री लेहून संतोशवीत असिले पाहिजे. राजश्री पंतप्रधान व आम्ही मौजे बेलोरे पा माहागाव प्रांत वराड येथे आलो. पुढे मजल दरमजल देवगड गढे प्रांतें येत असों. कळलें पाहिजे. रा छ १२ जमादिलाखर. +बहुत काये लिहिणे हे विनंती.

मोर्तब सुद.

श्री राजाशाहु छत्र-
पति स्वामी चरणीं
तत्पर दावलजी
सोमोषी सरलस्कर.

¶*Davalji Somwanshi congratulates Chimaji Appa on his victory over Daya Bahadur.*

---

*No. 27*] [*3-1-1729* ?

छ १० रमजान

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविले; पावोन वर्तमान कळो आले. दयाबाहादुर आमझेराचा[१] घाट बंद करून आमझरियावरी राहिला होता. त्यास तो घाट टाकून माडवगडचे घाटे चढोन गेलियावरी तो चालोन आला. याजकरितां जरूर जाणून युध करणे लागले. त्यास राजश्री स्वामीचे प्रतापे पराभवाते पावला. खासा वगैरे सरदार ठार पडले. लस्कर लुटले. हती अठरा पाडाऊ आले, म्हणून तपसिले लिहिले त्यावरून बहुत समाधान जाले. वडिलाचे पुण्य आपले पदरी समर्थ आहे. श्रीने येश थोर दिल्हे. आमचे वर्तमान: राजश्री दावलजीराऊ सोमवंसी

---

+ या पुढील मजकूर निराळ्या वळणाचा १ मध्य-हिंदुस्थान तिरलाच्या जवळ.

सरलस्कर याचा अमल मुलकात बसिला पाहिजे याजकरितां बीड, आबेड, पाथरी या मार्गें अवढियावरून वासीमचे रोखे आलो. पुढे देवगड डावे व चादे उजवे टाकून गढाच्या रोखे येतों. आपणास वर्तमान कळावे याजकरितां लिहिले असे. वरकड वर्तमान राजश्री पंतप्रधान याच्या पत्रावरून विदित होईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Pilaji Jadhao, who is accompanying Bajirao, mentions how happy he was to learn the details of Daya Bahadur's fall at the pass of Amjhera, to the west of Dhar. He communicates his own movements and plans. Girdhar Bahadur and Daya Bahadur, cousins themselves, and possessing the charge of the Subha of Malwa, were suddenly attacked and killed by Chimaji Appa within a month, the former about the 25th of November and the latter about 25th December 1728. This dramatic achievement raised the reputation of Bajirao and his brother.*

---

*No. 28*] [*3-1-1729*

( वरील भाग गहाळ )

लक्ष्मी अलंकृत * * * * *

स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनति. येथील क्षेम जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपले पत्र कासिदासमागमे आले तेथे लिा की, दयाबाहादर याचे युध्य जाहाले, मोडून तारांज[1] केले. हती घोडी पाडाव केली. प्रस्तुत उजनीसंनिध आहो. येथीलहि निर्गम सत्वरच होईल म्हणून लिा. त्यास राजश्री स्वामीचे पुण्यप्रतापेकडून श्री ने तुम्हास येश दिल्हे हे बहुत संतोष जाहाला. आम्ही प्रस्तुत पा कुन्हाडी या प्रांते आहो. रा कान्होजी भोसले यास सामील करून पुढे देवगड प्राते जावे हा विचार करून, अटोले त्याजकडे भेटीस अणावयासी पाठविले. त्यास ते भेटीस न आले. गावात जाऊन बैसले. त्याचा मनसबा काये तो न कळे. राजश्री सवाई संताजी भोसले फौजेनिसी देवगडचे सरदेस आहेत. त्यास सामील करून पुढे देवगड गढे प्रांते पुस वद्य अमावाश्ये इतके जाऊन. त्या प्रांते कागदपत्र पाठवावयाचे ते पाठऊन दिल्हे पाहिजेत. विशेष काये लिहिणे. रा छ १३ माहे जमादिलाखर. कृपा असो दीजे हे विनती.

¶*Pilaji Jadhao congratulates Chimaji on his victory over Daya Bahadur and informs him of his own movements (along with Bajirao), in attempting to settle the affairs of Ranoji and Kanhoji Bhosle.*

---

१ हैराण.

No. 29] [4-1-1729

पो छ २७ जमादिलाखर
मुा नजीक काईथे.

**श्री**

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ १४ जमादिलाखर मुा काा कलब्र पाा मजकूर प्राा वराड जाणून तुम्हीं आपणांकडील कुशल वर्तमान लिहीत जाणे विशेष. तुम्हीं पत्र छ २९ जमादिलोवलीचे उजनीचे मुकामीचे पाठविले ते प्रविष्ट जाहाले. लेखनार्थ विस्तारे अवगत जाहाला. नर्मदा पार होऊन मालवियांत गेलेस, गिरधर बहादर यास बुडऊन, उजनीस गेलेस हे सविस्तर वर्तमान लिहून पाठविले ते कलले. येसियास पूर्वी तुम्ही जासुदाबरावरी युधाचे वर्तमान लिहून आबझरियाचे मुकामीचीं पत्रें पाठविली ती प्रविष्ट जाहाली. वर्तमान विस्तारे कलले. येथील वृतात व पत्राची उतरे तुम्हांस पाठविली आहेत, ती प्रविष्ट होतील. सांप्रत आमचे वर्तमान तरी राजश्री दावलजीराऊ सोमवंसी सरलस्कर व आम्ही वराड प्रांते आलो. पुढे इकडील फौज राजश्री राणोजी भोसले यास समागमे घेऊन चाद्या देवगड प्राते जातो. तिकडील मनसबा करून पुढे मजल दरमजल बुधेलखडीकडे जाऊन होईल मनसबा तो केला जाईल; व तुम्हासहि वरचेवरी पत्रे पाठवून. तुंम्ही पत्रे याउपरी पाठवावी ती त्या रोके पाठवणे. आम्ही तिकडे आलियावरी तुम्हा-आ(म्हा)स जवलच पडेल. तुम्ही त्या रानी पोट भरणे. आम्ही त्या रानीं जातों. पुढे विचारासारिखा मनसबा करणे लागेल तो तुमचे आमचे विचारे लिहून पुसून केला जाईल. वर्तमान वरचेवरी लिहित जाणे. गुजरात प्रांतीचे वर्तमान लिहिले ते कलले. पुढेहि तिकडील वर्तमान लिहीत जाणे. तुम्हांस जो चांगला मुल्क वाटेल तिकडे जाणे. चिं+तांत अहंता न आणणे. पैका मिलोन कर्ज कसे फिटते ते करणे. इजत राहे आणि कार्य साधे तो अर्थ करणे. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao acknowledges Chimaji's letters about his success over Girdhar Bahadur and advises him to exact heavy fines in order to pay off the debts of Shahu. " Go roaming about wherever you like, but bring money some how or other," writes Bajirao.*

---

+ अक्षर बाजीरावाचें.

No. 30] [After 4-1-1729

छ ८ साबान मुा जावदे

श्री

पुरवणी. चिरंजीव राजश्री चिमाजी यासी आसीर्वाद उपरी. उजनी शहरची बोली तुम्ही केली होती त्यास बोलीस त्याणी बदल खाऊन काम नासले म्हणून वर्तमान आले आहे. सत्यमिथ्या कलत नाही. बोली जाहाली होती त्याप्रमाणे वोला मातबर वेतल्या असिल्या आणि पैकियाचा निर्वाह होत असिला तरी उतम जाहालें. कदाचित् दिलीकडून कोण्ही सुभा येणार असिला, त्याची वार्ता आइकून बल धरीत असिलें आणि पैका न देत, तरी त्या पैकियासाठी तेच स्थली गुतून राहातां येत नाही. वरकडहि स्थलें व प्रात पडला आहे. तेथील पैका वसूल जाहाला पाहिजे. यास्तव तेथे न गुतावे. राजश्री बाजी भिवराऊ यास अगर दुसरा सरदार हजार स्वारानसी उजनीस नेहमी ठेऊन माणूस आतबाहेर फटकू न द्यावे. जे माणूस शहरचे सापडेल ते जिवे मारावें. दरवाजेच बंद करावे. आपण अवघ्या प्रांताचा व जी माहास्थले असतील तेथील पैका कुल जफ्त करून वसूल घ्यावा. जो मुलूक कबजी असेल त्यास पुढे कौल देऊन अमलदार राहातील तरी ठेवावे. कदाचित दिलीकडून कोण्ही नवा सुभा रवाना होऊन येईल तरी त्याची बातमी आणवावी आणि जर तो आपल्या हकेटकेत[1] असिला तरी पुढे चालून जाऊन बुडवावा. मालवियात फौजेचा पराश्रम न होयेसारिखे करा. जर फौजे तिकडून जोरावार येत असिली, आपल्या गवसात न सापडे, तुम्ही आम्ही यक होऊन घ्यावी यैसा विचार दिसून आलियास आम्हास लिहून पाठवणे. आम्हीहि सत्वरीच येऊन सामील होऊन मनसबा केला जाईल. तुमचेच हकेटकेत असलिया तुमचे तुम्ही कलेल तसें करून मातबर पैका वेणें आणि कर्ज फिटून फौज फिटे तें करणे. देवगडचा तहरह जाहालियावरी आम्ही बुंधेलखंड प्राते सत्वरीच येत आहो. मनसबियाचा डौल दिसेल त्यासारिखे लिहून पाठवणे. +बहुत सावधपणे राहाणे. पैका मिलोन कर्ज लोक फिटेल यैसा मनसबा करणे. लोक बहुत विचारे राखणें. यकाचेच लगामी न लागणें. रा उदबाचे समाधान बहुत रक्षणे. परंतु तुम्ही आपले शाहाणपणे राहाणे. सुस्ती करीत न जाणे.

---

१ हकेटकेंत येणें = तावडींत येणें, किरणांत येणें.

+ From this sign Bajirao's own hand.

सुखावर द्रिष्ट न ठेवणे. द्रव्य साधे ते करणे. लोभ असो दीजे. आम्हाकडे मातबर काम पडले तरी लेहून पाठऊन ते क्षणी येणे. बहुत काय लिहिणे हा आसीर्वाद.

¶*Bajirao repeats his advice to Chimaji about exactions from Ujjain and other rich towns. "Be very cautious; execute such plans as will yield money; don't be guided by only one man's advice. Keep Udaji Pawar entirely pleased. Use discretion and be alert, without considering ease or comfort. If I send any urgent call for you, come away instantly."*

---

*No. 31*] [*9-1-1729?*

छ ३ साबान

**श्री**

श्रीमंत माहाराज राजश्री आपा स्वामीचे सेवेसी सेवक अंताजी गणेश आं[१] देसमुख प्रां पुणे सास्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान पौश वध्ये शेस्टी गुरुवासरपर्यंत स्वामीच्या कृपावलोकने करून येथास्थित असे विशेष. दयाबहादुर यासी युध्य प्रसंग जाला, स्वामीची फते जाली, हें वर्तमान ऐकोन बहुत संतोष जाला. स्वामी समर्थ आहेत. थोर येष आले. पुढेही असेच येष उदंड येणार. यैसी ईश्वरी कृपा स्वामीवर आहे. आम्ही पदरचे सर्वस्वे अहो. परामृष करीत गेले पाहिजे. कृपा वृधीते पात्रिजे हे विज्ञाति.

¶*Antaji Ganesh congratulates Chimaji on his victory over Daya Bahadur.*

---

*No. 32*] [*9-1-1729*

**श्री**

श्रीमत राजश्री चिमणाजीपंत अपास्वामीचे शेवेसी

पो बापूजी श्रीपत कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल पौश बहुलशष्टी गुरुवासरपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी येकोजी काला व राणोजी चव्हाण जासूद यासमागमे पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. दयाबाहादर यामधे व आपल्यामधे युद्ध जाले. दयाबाहादर याचा पराजय झाला. खासा ठार जाला. त्याचे लस्कर अगदी लुटिले म्हणून लिहिले. यैसियास

---

[१] धडफळे ?

दयाबाहादर याचा पराजय होऊन स्वामीस येश आले हे वर्तमान कळोन बहुत समाधान वाटले. थोर येश स्वामीस आले. ये गो(ष्टी)न त्या प्रांतांत स्वामीचा नक्ष बसला. स्वामी येशस्वीच आहेत. पुढेहि त्या प्रांतातील शत्रूचा पराजय होऊन स्वामीच्या मनोदयानुरुप होऊन येईल. वरकड या प्रांतीचे वर्तमान आलाहिदा पुरवणीपत्रांत लिहिले आहे त्यावरून विदित होईल. बहुत काये लिहिणे? कृपाभिवृधि केली पाहिजे हे विनंती.

¶*Bapuji Shripat congratulates Chimaji Appa on his victory over Daya Bahadar.*

---

*No. 33*] *[9-1-1729*

**श्री**

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यासी बाजीराऊ बलाल कृतानेक आसीर्वाद उपरी. येथील कुशल ताा छ १९ जमादिलाखर मुाा आष्टे पाा गिरडमडगाऊ प्रांत वराड जाणून तुम्ही आपणाकडील कुशल वर्तमान लिहून पाठवणे. यानतर तुमची पत्रे छ २९ जमादिलोवलीची आली. त्याआलीकडे पत्रे आली नाहीत. तरी सविस्तर लिहिणे. येथील वर्तमान छ १४ जमादिलाखरी लिहून पाठविले आहे त्यावरून कलेल. त्याआलीकडील वर्तमान तरी आजी मुकाम येथे जाहाला. येथून देवगडची सरद येक मजल आहे. देवगडावरी जातो. सीशा[१] (?) अगर सग्राम दोहीतून येक काये करितील पाहावे. आद्याप त्याजकडील पैगाम[२] आला नाहीं. परंतु येईल व तहही होईलसारीखे दिसते. येथील तह जाहालियावरी बुधेलखडाकडे जातो. तुम्ही याउपरी कागदपत्र तिकडे पाठवणे. राजश्री राणोजी भोसले फौजसहवर्तमान मालवा प्राते जाणार. सांप्रत घाट उतरून नेमाडाकडे गेले. कदाचित मालवियांत आले तरी लुटून टाकणे. आपणाकडील वर्तमान वरचेवरी लिहित जाणे. मालवा प्रातीचा टका अवघा जप्त करणे. बहुत युक्तीने चौकसीने पैका मिलवणे. जिकडे पैका मिलेल तिकडे जाणे. उर्मी चितात न धरणे. बहुत सावध राहात जाणे. +आम्ही तिकडे यावे म्हणून तुम्ही दौचौ पत्री लिहिले त्यासी आम्हीही गढे छत्रसालाचे मुलकात आलो आहो. येतां तुम्हास आम्हास जवलच आहे. काम मातबर असले तरी लेहून पाठवणे. त्यासारखे वर्तोन. नाहीतरी पोट तुम्ही तिकडे भरणे आम्ही इकडे भरितो. इकडे निकड येखादी कामाची असललियास लेहून पाठऊ

---

१ संधि (?) २ निरोप, बोलणें. + अक्षर बाजीरावाचें.

तेव्हा येणे. दोनी लस्करे येका जागा होऊन पैका कैसा मिळेल? याकरितां लिहिले असे व आलो नाहीं. लोभ असो दीजे. पैका सातारियास रवाना करणें. वालखेडीयास गेला तरी कार्यास येईल अगर हुंडीने आला तरी कार्यास येईल; परंतु रवाना करणे. हा आसीर्वाद. रा उदाजी पवार व रा मल्हारजी होलकर याचे समाधान वहुता रीतीने गोडीने गोड सब्दे राखणे. हा आसीर्वाद.

छ २९ रजब मुा नजीक बागलाण.

¶*Bajirao communicates to Chimaji his intentions of going to Deogarh and Bundelkhand and orders him to attack and plunder Ranoji Bhosle, should he encounter him in Malwa.*

---

*No. 34*] [*10-1-1729*

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपास्वामी साहेबांचे सेवेसी**

अज्ञाधारक धोंडाजी माहादेव साा नमस्कार विनती विज्ञापना. ताा छ २० माहे जमादिलाखरपाऊतो स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान येथास्तित असे. साहेवी कासिदाबरोबर व जासूद आपण पाठविला होता त्याजबराबर पत्रे पाठविली तेथे अज्ञा ते पाऊन संतोश पावलो. साहेव पुन्यपुरूश आहेत. दिग-विजय जाला याजवरून परमसंतोश पावलों. तेथे अज्ञा केली की श्रीमंत राजश्रीस आपण पत्रे लिहिली आहेत तरी तुम्ही मुजरत जासूद पाठऊन उतर आणून पाठवणे. आज्ञेप्रमाणे आपण कासिदाबराबर जासूद देऊन लस्करास पाठविले. त्यास माहोर प्रांती श्रीमत राजश्रीपासी पत्रे पाठविली. त्यास तेही स्वामीस प्रत्योतरे दिल्ही, तें कासिदावराबर पाठविली आहे. त्याजवरून साकल्यें कळो येईल. श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीन आपणास अज्ञापत्र पाठविलें तेथे अज्ञा की स्वामीपासी द्रव्य जमा आहे; त्यास मार्ग कठीण, याजकरितां ब-हाणपुरीच्या साउकाराची पत्रे उजनीस पाठवावी की तेथून हुंडिया करून ब-हाणपुरास आणवावी. ब-हाणपुरीहून चालती हुडी करून सातारा रा अबाजीपंतापासी रुा पावत ते करणे येसे लिहिले. त्यास आपण आज्ञाधारक. उजूर कार्य आहे. त्यास सांप्रत स्वामीसी व उजनीकरासी सल्लख अद्याप जाला नाही. स्वामीचे रुा उजनीमध्ये कैसे पावतात आणि साउकार हुंड्या कोन्हे विचारे करून देतील याजकरिता विज्ञापना केली जाती की साहेबाचा सल्लख उजनीकरासी जालिया सावकारास मातबर दुकानी रुा देऊन, आमच्या जागाच्या हुडिया पाठवाव्या. आपण रुा अवरगाबाजेस रा बाबूरायापासी देऊन रसीद घेऊ. तेथून ते

समरुशीस रा॥ पावते करितील. अगर आपणासच अज्ञा होईल तरी चालती हुंड्या सावकारापासून करऊ. हुडणावळी करार चालो देऊन रुसीपर्वतास पावते करून अगर सलूख उजनीचा न होये तरी जे द्रव्य असल ते आपले इतबारी स्वारापासी द्यावे. बराबर पांचसातसे स्वार देऊन बऱ्हाणपुरास पाठऊन द्यावे. आपण येथून हुंड्या करून देऊन रुषिपर्वतास पावते करून. या दोहीविचारामध्ये जे पसद पडील ते करावे. याजउपरी दरबारी वर्तमान क्षणक्षणा लिहीत जाणे म्हणून अज्ञा केली. त्यास श्रीमंत राजश्रीची स्वारी गोदातीरास आली. त्यास नवाब येवजखाजीनी रा॥ गणेशपंत कुटे यास पाठऊन सलूख केला की आपली जागीर वऱ्हाडी आहे, त्या प्रातामध्ये न जावे. माहोर प्रातामधून देवगडी प्राते जावे यैसा पैगाम केला तो रा॥ नी मान्य केले. त्यासी सलूख रक्षून माहोर प्रांतामधून देवगड प्राते गेले. नवाब निजामुनमुलुक भागानगर प्राते महिदर्गी प्राते अपाराय यळमा याच्या गडीवर आहेत यैसे वर्तमान आहे. माहाराज स्वामी रुषीपर्वती आहेत. सर्व वर्तमान अजीपाउतो स्वस्तिक्षेम असे. स्वामीस विदित होवे याजकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनती.

¶*Dhondaji Mahadev, Davalji Somvanshi's Karbhari, writes to Chimaji Appa news of Bajirao's movements and the way in which money can be sent to the Deccan. This is after the fall of Daya Bahadur.*

---

*No. 35*] *[11-1-1729*

## श्री

### श्रीमत् महाराज राजश्री
### पंत आपा स्वामीचे सेवसी

विनंती सेवक आज्ञाधारक मंडोजी (लाडोजी?) पा॥ ढमढेरे का॥ तलेगाऊ सां दंडवत विनती. विनवावया प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ता॥ छ २१ जमादिलाखरपर्यंत श्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित आसे. यानंतर स्वामीकडील वर्तमान काही कलत नवतें. त्यावरी राणोजी व येकोजी जासूद याजबराबरी तुमची पत्र सातारियास गेली. त्याणी वर्तमान सागितले की उजनीचा सुभा दयाबहादूर बुडविला. यैसे वर्तमान यैकोन बहुत संतोश जाला. यानतर श्वामीनी

मतवाली घोडी आपणापासी जाते वेलेस ठेविली ते सबर आहे. तिची निगादास्त सागितल्याप्रमाणे करीत आहो. श्वामीस कलावे म्हणऊंन लिा आहे. यानतर तीर्थरूप राजश्री जानोजीबावानी जाते वेलस श्वामीस विनती केली होती की येक घोडा तुरकी मातुश्रीकारणे दिल्हा पाहिजे; त्यावरून श्वामीनीहि मान्य केले. तरी राजश्री खंडबा तेथे आहेत. त्यासपासी येक घोडा मातुश्रीस बसावया योग्य दिल्हा पाहिजे. श्वामी म्हणतील की खंडबाकडे घोडे सापडले आहेत. तरी त्यावरी चालढकल दिल्ही न पाहिजे. खामखा येक घोडा तुरकी दिल्हा पाहिजे. विशेष ल्याहावे तरी श्वामी सर्व जाण आहेत. बहुत काये लिहिणे. हे विनती १००००

¶*Mandoji Patil Dhamdhere congratulates Chimaji on his victory over Daya Bahadur.*

---

*No. 36*] [*23-1-1729*

**श्री**

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी यांसी बाजीराऊ बलाल आसीर्वाद उपरी. येथील कुशल माघ शुध पंचमी गुरुवार मुाा नजीक नागपूर प्राा देवगड. तुम्ही आपणांकडील कुशल वृत लिहून पाठवीत जाणें. येथील वर्तमान पूर्वी तुम्हांस लिहून पाठविलें आहे त्यावरून कललेच असेल. सांप्रत मजल दरमजल येऊन देवगडचे सरदेमध्ये मुकाम केला. देवगडकरी यांकडून येसाजीपंत नेगी (?) व रा लक्षुमणजी खंडागले तहरहच्या मुकदम्यास येऊन बोलीचाली केली. मातबरच बोली करावी यैसा विचार होता, परंतु देवगडकरी याणी येकनिष्ठता बहुतच धरिली. यास्तव विचारानरूप समयेपरत्वे त्याचे मर्जीमाफकच बोली कबूल करून सौरहस्य संपादिलें. पुढे त्याणी हरयेकविसी श्नेहाने वर्तावे यैसा सिधांत करून बुंधेलखंडाकडे यावयाचा विचार केला आहे. याउपरी मजल दरमजल त्या प्रांते जाऊन वर्तमान लिहून पाठऊन. लोभ असो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao informs Chimaji of his intention of going to Bundelkhand.*

No. 37] [January 1729

[stamp]

श्री

श्रीमंत राजश्री आपासाहेब स्वामीचे शेवसी

पोश्ये धोंडाजी महादेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशळ सदैव लेखनअज्ञा केली पाहिजे. स्वामी रुषीपर्वतीहून[१] नर्मदा पार गेले, त्याउपरी यौवनाकडील दयाबहादुरासी आपणासी योध्यप्रसंग जाला, त्यास पराभवातें पाठविले, दिगविजय जाला, हें ऐकोन परमसंतोश जाला तो कोठपर्यंत ल्याहावे ? स्वामी पुन्येपुरुश येशस्वी आहेत. आम्हाला त्यांचे छत्र आहे. साइबांचा दिगविजय होवा हेच इच्छीत आहो. त्यास सांप्रत ऐकोन आनदाते पावलों. परंतु साद्यंत वर्तमान कळो येत नाहीं. याजकरितां सेवेशी विज्ञापना लिहिली आहे. तरी कृपा करून साद्यंत वर्तमान लिहिले पाहिजे. तेणे-करून चिताचे समाधान होईल. आपण चित्तवृतीपासून कल्याण स्वामीचे इच्छितो की सदासर्वकाळ विजय होवा. स्वामीकडील दिगविजय जाले हे वर्तमान ऐकोन श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीस वार्तिकाबराबर लेहून पाठविले आहे. आपणाकडील साद्यंत वर्तमान लेखन होऊन आले म्हणजे सविस्तर लेहून पाठऊन. सेवेशी विदित ज्ञाले पाहिजे. आपण भाग्याचे विभागी म्हणवितो. पूर्व कृपेची वृद्धि केली पाहिजे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Dhondo Mahadeo congratulates Chimaji Appa on his victory over Daya Bahadur.*

---

No. 38] [January 1729 ?

श्री

श्रीमंत राजश्री अपासाहेब स्वामीचे सेवसी

अज्ञाधारक धोंडाजी माहादेव सा। नमस्कार विनंती विज्ञापना. ता। छ माहे जमादिलांखर स्वामीचे कृपादस्टीकरून वर्तमान येथास्तित आहे. स्वामीचे सेवेस वार्तिकाबराबर पत्रे पाठविली होती. याचे उतर आज्ञाधारकास लेहून पाठविले तेथे दयाबहादुराचे वर्तमान साकल्ये लिहिले. त्याजवरून परम संतोश (जाला). साहेब पुन्येपुरुष आहे. दिगविजये जाला. हे सर्व राज्यामध्ये कीर्ति जाली. येश मोठे प्राप्त जाले. यैसेच उतरोतर श्री दिगविजई करील हा

---

१ ऋषिपर्वत = सप्तर्षि = किल्ले सातारा.

आपणास पूर्ण भरवसा आहे. सांप्रत आपणास आज्ञापत्री हुकूम केला की राजश्री पंत प्रधान कोन्हे प्रांते येणार हे बातमी आपणास लिहीत जाणें. त्यास आपण आज्ञाधारक, आज्ञेप्रमाणे वर्तणूक केली जाईल. सांप्रत श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीची स्वारी नांदेड प्राते आली आहे. त्यास रा॥ कान्होजी भोसले व सवाई सताजी भोसले या उभयेताची भेटी जाली म्हणजे देवगडी प्रांते यावे ऐसी वार्ता आहे. सेवसी विदित जाले पाहिजे. नवाब निजामुलमुलकाची वार्ता अवरगाबाजेस यावयाची वार्ता आहे. तहकीक खबर अलियां सेवसी लेहून पाठवितों. विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Dhondaji Mahadeo congratulates Chimaji Appa on his success against Daya Bahadur. He further informs him of the probable arrival of Bajirao at Deogad and of the Nizam at Aurangabad.*

---

*No. 39*] [*3-2-1729 ?*

**श्री.**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवस विनंती**

आज्ञाधारक धोंडाजी माहदेव कृतानेक सा॥ नमस्कार विनंती. ता॥ छ १५ रजबपाउतो स्वामीचे कृपादस्टीकरून वर्तमान येथास्तित असे विशश. या प्रांताचे वर्तमान तरी नवाब निजामुनमुलुक भागानगरी आहेत. नवाब यैवजखानी अवरंगाबाजेहून स्वार होऊन दाहाबारा कोसावरी मोकाम केला आहे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान देवगडावरी श्वारी केली अहे. वरकड वर्तमान तरी येथास्तित आहे. रा॥ श्रीपतराय व रा॥ फतेसिंगजी माहोर प्रांते आले आहेत यैसी वार्ता अहे. साहेबी दोनी च्यार वेळा लिहिले, यैसियासी तर्तूद बहुत केली. परंतु परस्तुत अनकू(ल)ता योजून येत नाहीं. येदंनिमित्य कासिदास बहुत प्रकारे सांगितले अहे. अनकूल जालिया सेवस पाठऊन देऊन. विदित जाले पाहिजे. साहेबी आपणाकडील वर्तमान त्याहित जावे. तेणेकरून संतोश होत जाईल. विशश काये लिहिणे, कृपालोब असो दीजे, हे विनंती.

¶*Dhondo Mahadeo informs Chimaji Appa of Bajirao's attack on Deogad. The news about the Nizam's arrival at Bhaganagar and Shripatrao Pratinidhi and Fatesing at Mohor is also given.*

No. 40] [पौ 10-2-1729 ?

छ २२ रजब

श्री

राजश्री आपा गोसावी यांसी

श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहांकित संताजी जाधवराव दंडवत विनती. येथील कुशाल जाणोन स्वकीये लेखणआज्ञा केली पाहिजे विषेश. आम्ही गंगथडीस माहालमुलकामधे जातों. आपणास कलावे यास्तव लिहिले असे. आपण हरयेकविसी कागदीपत्री नवाबास व राजश्री आनदराऊ सुमत यास लिहून कामकाज सुरलीत चाले ते करावे; व रा। आवजी कवडे यासी प्रा। आमलनेर याविसी लिहावे. निमित्य की तेथे जागीरदार नूतन जाहाला आहे तो सुदामत तहावर येत नाही. हरयेकविसी मदत करीत ते केले पाहिजे व मौजे तोंडिले[1] व मौजे लोणी ता। निरथडी हे गावी खासगत घोडी सिंगरे वगैरे कारखाना आहेत ;, च्यार सेरेकर[2] आहेत, चाकर आहेत, दोन घरे कुणबियाची मात्र आहेत ; वस्तीस मात्र जागा आहे. वेटबेगार व फर(फड) फर्मासीचे माहालाचे रोखे होतात, तर आपण राजश्री बापूजीपंत यास सांगोन या दोन्ही गावावर कृपा करून रयात[3] होये ते करवावे. येविसी वारंवार विनंती लिहावी येसे नाही. आमचा अभिमान धरिला आहे तो सर्वप्रकारे सिधीस नेऊन आमचा सांभाल केला पाहिजे. बहुत लिहावे तर आपण सर्वजाण आहेत. कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

मोर्तब सूद

¶*Santaji Jadhav, son of Dhanaji, to Chimaji, requesting attention to his difficulties in collecting the land dues.*

---

No. 41] [17-2-1729

छ २९ रजब

श्री

श्रीमत राजश्री आपास्वामी साहेबांचे सेवसी

अज्ञाधारक धोंडाजी माहादेव कृतानेक सा। नमस्कार विनंती. ता। छ ९ रजबूपाऊतो स्वामीचे कृपादृस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे.

---

१ तोंदळ शिरवळजवळ, ता. पुरंदर.
२ शेरी जमिनीचे म्ह. इनामी जमिनीचे मालक.
३ सूट.

साहेबी अज्ञापत्र पाठविले तेथे अज्ञा की त्या प्रांतीचे वर्तमान लिहीत जाणे. त्यास श्रीमत राजश्री देवगडप्राते स्वारी करोन आले. नागपुरीहून आपली माणसे आली. स्वामीस पत्र आले ते सेवसी पाठविले आहे त्याजवरून कळो येईल. देवगड प्रांतीचा तहरह होणार होता तो जाला असल अगर होईल. नवाब निजामुनमुल्काचे वर्तमान तरी अपाराय येळमायाचे गढीस लागले होते. तेथील बदबस्त करून फिरून भागानगरासंनिध आले. अवरंगाबाजेस येणार म्हणून वर्तमान आहे. साहेबास विदित होवे. याजउपरी नवाव येवजखानी शाहरीहून स्वार जाले, घाटावरी आले. अलजपूरप्रांते येणार म्हणून वार्ता आहे. राजश्री श्रीपतराय नादेडप्रांते आले येसी वार्ता आहे. महाराज श्री रुषीपर्वती आहेत. विदित होये. साहेबी कासिदच्या जोडियाचेविशाई लिहिले होते. त्यास आपण कासिदचा मिर्धा बोलाऊन सांगितले. त्यास परस्तुत लस्करास यावयाचे त्याचे अनकूल पडत नाहीं. आपण तलाशामध्ये अहो. जासूद अगर कासीद अनकूल पडलिया पाठऊन देऊ. आपणाकडील क्षणक्षणा येणाराबराबर वर्तमान ल्याहवे म्हणजे श्रीमत राजश्री कडे पत्र पावत जातील. आपण अज्ञाधारक अहो. सेवसी विदित जाले पाहिजे. कृपा लोभ पूर्ण असो दीजे. वरकड वर्तमान राजश्री बाबूरावजीनी लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. हे विज्ञापना.

¶*Dhondaji Mahadeo to Chimaji Appa, giving news of Bajirao and the Nizam's movements.*

---

*No. 42*] [*25-2-1729* ?

**श्री**

**श्रीमंत माहाराज राजश्री आपा**
**स्वामींचे सेवेसी**

सेवक बाजी अनंत कमावीसदार प्रा बढवा वगैरे प्रा तलाटी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ ७ साबानपरियेत येथास्थित आसे. यानंतर राजश्री सयाजी गुजर नर्मदा उतरोन, प्रा मारी येऊन मुकाम केला; आणि तमाम तलाठीचे जमीदारास मसाले करून आणिले. आपणहि पलीकडे जाऊन भेटलो की, 'मुलुकात स्वारी पाठविली, लुटितात; धामधूम न करणें. मुलूक राजश्री पंतप्रधान याचा आहे, ते शब्द लावितील.' कितेक प्रकारें सागितले. परतु नायैकेत. बोलिले जे, सरकार माडेवगड आपले मुकासे;

तुम्हास बोलावयास प्रयोजन काये ? मुलुकाचा उसूल यैवज घेतो. दरबारी प्रसग पडिला तर, जाब देऊन. प्रा मार व प्रा बगोद व प्रा कन्हई व प्रा धारगांव व प्रा महेश्वर व प्रा धर्मापुरी व प्रा काटकूट येणेप्रा प्रगणे मिलोन, दा हजार वसूल घेतला. व बढवाईचा घोडा नजर व तमाम मुलूक लुटिला. जाळून रबी चोरिली. गुरे ढोर नेली. गुंढी[1] लुटिली. याप्रा नाश केला. याजमुळे तमाम तलाठीचे आमल बद जाला. आपण लस्करचा मार्ग लक्षीत बैसलो आहे. उठोन जाऊन. जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. विशेष काये लिहिणे. हे विनती.

¶*Baji Anant to Chimaji Appa, complaining about Sayaji Gujar having plundered the districts of Badhwa and Tilati.*

---

*No. 43*] [*8-3-1729*

छ १० रमजान

## श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव विजईभव राजमान्ये राजश्री चिमाजी आपास प्रति चिमणाजी दामोदर कृतानेक आसीर्वाद. येथील क्षेम फालगुन बहुल पंचमी भृगुवासर मुा कसबा बहादुरपुरा[2] क्षेम जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. तुम्ही गेलियातागाईत कांही वर्तमान कलत नव्हते. याकरितां समाधान नव्हते. त्यास उजनच्या सुभियाचें वर्तमान तुमच्या विजियाचे यैकिले. त्यावरून समाधान जाहाले ते कोठवर ल्याहावें ? परंतु तत्वता कलले नव्हते. तो तुमच्या लस्करातून रा भास्कर माहादेव रा अंताजी रुद्र याच्या गोटातून आले. त्याही सविस्तर वर्तमान सांगितलें. ते रोजी साकर वाटिली. हर्ष यैसा जाहाला कीं, बहुतांच्या तोंडास कालिमा लागली. या कार्यावरून येशाचे नगारे विख्यात जाहाले. श्री तुम्हास कल्याण करू. याउपरी लौकरच त्या प्रांताहून आगमन होईल. भेटी व्हावी यैसा हेत बहुत आहे. चिरंजीव राजेश्री बाजीराऊ देवगाडे प्रांते होते. प्रस्तुत कोणीकडे आहेत कलले नाही. रा श्रीपतराऊ व फतेसिग यैसे निर्मलेकडे आहेत. भागानगराहून नवाबहि म्हसे मुधोलावर आले आहेत. त्याची त्यांची विरुधताहि नाही आथवा भेटीचाहि योग नाही. कलावे म्हणून लिहिले आहे. पुढे काये होईल पाहावें. आमचे वर्तमान: नवाबाकडून दोन पत्रें आली आहेत कीं, लौकर येणे. त्यास जाणे जरूर. परंतु

---

१ गुळीं. आश्रयार्थ एकत्र एकादे ठिकाणीं जमलेला जमाव त्यास गुढे किंवा गुळे म्हणतात.

२ धुळ्याचे उ. ८ मैल.

खर्चाची तंगचाई बहुत आहे. परंतु जरूर जावे लागते. प्रतिपदेच्या मुहूर्ते स्वार होऊन. रुणानबंधे तुमचे दर्शन होईल तर, उतम आहे. आमचे स्मरण न टाकणे. बहुत काये लिहिणे. लोभ आसो देणे. हे आसीर्वाद.

हो चिरजीव राजश्री गणपतरायास आसीर्वाद. चिरजीव राजश्री आपास यश आले. बहुत सतोश जाहाला. बयाज[1] ल्याहावा तरी, त्या यशास तुम्ही विभागीच आहा. लोभ आसो दीजे. हे आसिर्वाद. हो चिरंजीव राजश्री बाजीरायास[2] आसिर्वाद उपरी. युध्यामध्ये तुम्ही बहुत कस्त केलीत, ते समई तुम्हास गोळी लागली याकरिता खेद जाहाला. परंतु श्रीने येश दिल्हे हे श्रवण होऊन खेद दिगांतरी जाऊन, हर्श आतिशये जाहाला तो कोठवर ल्याहावा? बरे. चिरंजीव आपाच येशस्वी आहेत. त्यांचे तुम्ही विभागी आहा. भेटी होई तर उतम आहे. बहुत काये लिहिणे लोभ आसों दीजे. हे आसीर्वाद.

*¶Chimnaji Damodar congratulates Chimaji Appa on his victory over the Subhas of Malwa and gives news of the Nizam.*

---

*No. 44*]

[*April 1729?*

**श्री**

**श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवसी विनंती**

आज्ञाधारक धोंडाजी माहादेव कृतानेक सा। नमस्कार विनंती. ता। छे[3] माहे सवालपाऊतो स्वामीचे कृपादस्टीकरून वर्तमान येथास्तित असे. स्वामीनी जासुदाबरोबर आज्ञापत्र पाठविलें तेथे आज्ञा की, इंदुराकडील यैवज काय आला आणि तुम्ही रूसीपर्वतास काय रवाना केला? त्यास, रा। कुसाजी गणेशानी दोनी वेळा मिळोन हुंडिया पाठविल्या; रु २७५३३॥। पाठविला. त्यास येथे प्रसंग विपर्यास देखोन येथून हुंडी अवरंगाबाजेची रा। कृस्णाजी नाईक जोसी याच्या नावे करून रवाना केली सतावीस सहस्र; त्यास दर सदे हुंडिणावली रु। १ प्रा। दिल्हा. अवरंगाबाजेहून सातारियास रा।। नाईकी रा। दादोपंताच्या नावे हुंडी करून रूसीपर्वतास रवाना केली. त्यास येथे यैकिलियात आले आहे की, अवरंगाबाजेहून हुंडी सातारियास जाते, याची दर ती हुंडिनावण घेतात. स्वामीस विदित होवे याजकरितां लिहिले आहे. बाकी आपणाकडे पाचसे पावणेचौतीस रु। राहिले आहेत. त्यास आणीक हुंडिया,

---

१ तपशील. २ बाजी भीवराव रेठरेकर. ३ तेरीख मुळांत लिहिलेली नाहीं.

कुसाजी गणेशें[1] याजकडून सांप्रत येवज येणार हा येवज आलिया, बाकी व हाली रुा येतील ते पाठऊन देऊन. आपणापासून अंतर पडणार नाही. याजउपरी आपला मार्ग युवेन[2] पाहात देवगडी प्रांते राहिला होता, त्यास, स्वामीच्या आगमनाचे वर्तमान येकोन याची वार्ता अवरंगाबाजेस यावयाची आहे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान पूर्व देशामध्ये गेले आहेत, त्याचे साध्येंत वर्तमान किमपि येत नाही. याजकरितां मुजरत कासीद अजुरदार करून पाठविला आहे, तोहि अद्याप आला नाही. विदित जाले पाहिजे. रा श्रीपतराय व रा फतेसिंगजी व रा कान्होजी भोसले मुख्य युवनांस[3] भेटले. पुढे मनसुबा होईल ते पाहावे. आपणास या प्रांतीचे वर्तमान श्रुत होवे म्हणून लिहिले आहे. साहेबी श्रीमंत राजश्री पंतप्रधान याजकडे मुजरत कासीद अजुरदार करून जेथे असतील तेथे पावऊन जाब आणऊन पाठवणे म्हणून लिहिले. आज्ञेप्रा कासीद अजुरदार करून पत्रे रवाना करून जाब आलिया सेवस प्रविस्ट होईल. व रा दिगंबरपंत तो अद्याप आले नाहीत. त्याजकडेहि पत्र प्रविस्ट करून. स्वामीनी धनाजी पवार व राणोजी चव्हाण यास रुा १० दाहा देविले ते आज्ञे-प्रमाणे प्रविष्ट केले. विदित होये हे विज्ञापना.

¶*Dhondaji Mahadeo to Chimaji Appa, informing him of his having remitted to Satara a sum of some 27,000 rupees received as dues from Indore. The writer further gives some news of the North, that some Mussalman official was at Deogad but intends to proceed to Aurangabad and that Shripatrao and Fatesing and Kanhoji Bhonsle had an interview with the Nizam.*

---

*No. 45*] [*4-4-1729*

## श्री

### नकलपत्र राजश्री पिलाजी जाधव

वेदशास्त्रसपन माहाराज राजश्री नारायण दीक्षित स्वामीचे शेवेसी सेवक चरणरज पिलाजी जाधवराऊ साा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ रमजान मुाा धरणेंपारणें स्वामीचे आसीरवादेकरून सुखरूप असों. यानंतरी या प्रांतास आलिया देवगडचे सल्य संपादून गढ्यावरून आलों तो महमदखान बंगश प्रयागचा सुभा वीस हजार फौजेनसीं आला. त्यास सिकिंदों[4] करून कोंडिला आहे. त्यांच्या लस्करांत तीं रुपयांचा सेर अंन जाले आहे.

---

१ हा पिलाजी जाधवाचा इसम इंदुरास असलेला.

२ यवन.

३ निजामास.

४ जेर करून.

रसद् कुली बंद केली आहे. या आठां दिवसांत त्यांस बुडऊन टाकितो अगर सलियास आला तरी सला करून लवकरीच देशास येतों. स्वामीचे दर्शन जालियावरी सविस्तर वर्तमान निवेदन होईल. पूर्वी स्वामीनीं आसीरवाद दिल्हा त्याप्रो येमुनातीरपर्यंत आपला अमल जाला. लस्करचे लोक महायात्रिसहि गेले आहेत. स्वामीस वर्तमान कलावे म्हणोन लिहिलें असे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Narayan Dikshit, informing the latter of his having besieged Mohammad Khan Bungash and having extended Maratha conquests up to the Jumna. The date corresponds to the entries in the Diary.*

---

*No. 46*] [*19-4-1729*

## श्रीशंकर

श्रियासह चिरंजीव विजयी भव * * * राजश्री चिमाजी आपा यासी चिमणाजी दामोदर कृतानेक आसी (र्वाद). क्षेम वैशाख शुध द्वितीया मंद (वासर) बहादरपुरा जाणून स्वकीये कुशल (लेखन) केले * पाहिजे विशेष. बहुत दिवस पत्र पाठऊन कुशल वर्तमान लिहिले नाही * * ध समाचार कलत नव्हता. परंतु दयाबाहादुर याचा पराभव (करून कि) तेक देश आक्रमिला हे (पर) स्पर कलोन संतोशावाप्ती * * * ता प्रस्तुत आजच राज(श्री) सोनवणी याचें पत्र * * * * * पलसनेर प्राा खंबायत * * * बहुत संतोश जाहला * * * की भेटी व्हावी. त्यास धुल (यास) फौजेचे मुकाम जाहाली (वर) व राजश्री गणबास पुढें पाठवणे. आपली भेटी जाहालियाने जैसी * तजवीज तुमच्या व याच्या विचा (रे ठरे) ल त्याप्रमाणे विचार केला जाईल. परंतु लक्ष प्रकारे भेटीचा प्रसंग होये ते करणे. बहुत काय लिहिणे ? मानाजी जा (धव) याने बहुत बेइमानी मांडिली आहे, (आम्ही) * * औषध आहे कांही चिता (नाही तु) म्हास कलावे म्हणुन लिहिले. (बहुत का) यें लिहिणे. लोभ असो (दीजे हे विज्ञापना)

¶*Letter of Chimnaji Damodar to Chimaji Appa, written after the death of Daya Bahadur.*

1208

No. 47] [27-5-1729 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

सेवक आज्ञाधारक गोविंद कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ताा छ ९ जिलकादपावेतो स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून जुन्नर प्रांतीचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रें आलीं तीं पावलीं. सविस्तर वर्तमान कललें. गगनास गवसणी घालून उतर दिश्या जिंकोन दक्षणेकडील शह जिंकोन सर्वांचे गर्व परिहार करून येशाकीर्ति भूमंडली न माये यैसा कीर्तिघोष स्वामीचे पदरी पडला हें संतोषाचे वर्तमान यैकोन सेवकास बहुत अल्हाद जाहाला तो त्रैलोक्यांत न माये यैसा जाहाला. वरकड आज्ञापत्राचें प्रतिउतर बितपसील.

पाईटचे रुपये पांचसें घेणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे वसूल घेऊन रा सिवरामपंताकडे जमा केले. मजकूर.

१

शंक्रांत जाहलियानंतर दुलाजी मोरया याजबराबर तिळगूळ व पत्रें पाठविली त्यास बहुत दिवस जाहालें. स्वामीकडे पावली कीं नाही हें न कले. मजकूर.

१

श्रीभीमाशंकरी कमलजेच्या तळ्यावर बेलदार गुदस्तां लाविले होते. आगाव त्यांजला शंभर रुपये दिल्हे आहेत. आणखी दोन तीनसे देऊन काम चालीस लावणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे त्यांचा तलाश केला परंतु कोठे ठिकाण लागेना. मजकूर.

१

गला च्यार हजार रुपयांचा खरिदी करणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणे दर रूपयास सेरी मापे नव पाईली प्रेाा गावगना सि * रून ताकीद केली. मजकूर.

१

स्वामीने कितेक (बु) धिवाद लिहिला. (ये) थें चितांत धरून वर्तणूक करून. मजकूर

१

जुनर प्रांतीचा वसूल गुदस्तांप्रमाणे घ्यावयाची ताकीद केली. (पिक) ले गेले यैसे ज्या गांवाना पीक असेल त्याला जमावंदीचे समई (रया) येत करावी लागेल. मजकूर.

१

आंगरे देशमुख याणी सालगुदस्ता हक घेतला नव्हता. सालमजकुरी गुदस्तांचा हक व सालमजकूरचा हक

या प्रांती जरीचा[१] उपद्रव जाहाला. घरोघर गावांचा गांव माणसे दुखण्याने पडतात. बरी होतात. ज्याची दोरी तुटली ते मरतें. मजकूर.

१

आपले आज्ञेप्रा वसूल घेतात. हक दोहीकडे दोन द्यावे. भिकणे[२] दोहीकडेहि देऊ नये म्हणून आज्ञा. आज्ञेप्रा ताकीद केली. मजकूर

१

येणेप्रमाणे मजकूर स्वामींस विदित व्हावा म्हणून शेवेसीं लिहिलें असे. शेवेसी श्रुत होये. वसूल बाकी सालमजकूरची स्वामीने आणविली. यैसियासी वसूल गावाचा गाव वरचेवर होतच आहे. यामुळे जमाबंदीचे वगैरे गांवचा वसूल कलेल. बहुत काये लिहिणे ? कृपा लोभ असों दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Govind Krishna, Peshwa's mutalik at Shrivardhan, to Chimaji Appa, congratulating the latter upon his conquest over both North and South. Some details regarding the province of Junnar, which was under him, are given in the sequel.*

---

*No. 48*] [*26-6-1729* ?

छ २९ जिल्हेज

**श्री**

पुा राजश्री चिमाजीपंत आपा गोंसावियांसी

विनंती उपरी. राजश्री बाजी भिवराऊ व चिरंजिव राजश्री आपा यांची पत्रें छ १९ जिलकादची जाधवहटीचें मुकामचीं आली. सर्व सुखरूप आहेंत. पलीकडील उद्योग संपादून जाधवहटीमध्यें प्रस्तुत आहेंत. दिलीहून मंहमदखांन बंगस ग्वालेरीस येत होता. चंबेलीचे रेतीमध्यें आपले फौजेचे वर्तमान ऐकिलें, मग तेथेच मुकाम करून राहिला. आपल्या फौजा जाऊन चारपाच रोज सिकंदों[३] केला. मग त्याचकडलि भला माणूस आला. इकडून राजश्री कुसाजी गणेश पाठविले होते. राजश्री राऊ स्वामींचा तिकडे श्नेहाचा विचार, याजकरितां ते गोष्टीवर नजर देऊन फौजा फिरोन आल्या हे वृत त्याणी लिहिले होतें. आपणास

१ जरीमरीचा.

२ जकातीवरील पट्टी.

३ सिकंदा = तंग, हैराण.

कळावें याज करितां लिहिले असें. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती. सांप्रत पर्जन्यकाल समीप आहे. येथे सारची पागेची घोडी आहेत त्यास पाऊसात मोमजामे[१] पाहिजेत, यैशियास जामदारखानात मोमजामे आसतील तरी दोन तीन मोमजामे पाठविल पाहिजेत. विशेष काये लिहिणे हे विनंती

मोर्तब
सुद

¶*Pilaji Jadhav to Chimaji Appa, writing about the opposition he encountered from Mohammad Khan Bangash, and mentioning the overtures of peace which had been opened with him.*

---

*No. 49*] [पो *22-7-1729 ?*

पै. छ ६ मोहरम.

**श्री**

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामीनी लिहिलें कीं रा मलारजी होळकर व राजश्री राणोजी सिंदे व राजश्री कंठाजी कदम व राजश्री आनदराऊ पवार यैशा तमाम फौजा मारवाड प्राते पाठविल्या. समागमेच अवघ्या फौजा असिल्याने राणाजीच्या व सवाईजीच्या मुलकास उपद्रव देता न ये. येवढ्या लस्करास पोटास तो पाहिजे, यास्तव मारवाडांत पाठविल्या म्हणून लिहिले. यैसियासी स्वामीनी विचार केला तो उ(त्तमच केला.) फौजा त्या प्रांते गेल्या. यामुळे अभयेसिंग यासीहि शह बसला व त्याच्या मुलकास उपद्रव दिल्याने सवाईजीच्याहि मनोदयानरूप जाहाले. पुढे अभयेसिंग कमरदिखान याजकडील लगा उडऊन स्वामीच्या विचारांत येतील व आपली फौजहि ताजी जाहाली आणि जेव्हां काम लागेल तेव्हा येऊन हाजीर होतील. साराउष स्वामीनी विचार केला हा सर्वागोस्टीनी उतम केला. विदित जाहाले पाहिजे हे विनंती.

¶*Purandare to Bajirao, communicating Shahu's approval of Bajirao's action in having dispatched Holkar and Sindia into the Jodhpur territory.*

---

१ मोमजामा = मेणकापड.

No. 50] [1729 ?

छ ६ मोहरम

श्री

पुा राजश्री पंतप्रधान गो-
सावियांसी,

विनंती. राजश्री बाजीराऊ व चिरंजीव राजश्री आपा याजकडील कागदपत्र स्वामीस येतच असतील. त्या प्रांतीचे तो कामकाज उरकलेच आसेल. त्यास तिकडील मनसबियानुरूप त्यास जे आज्ञा कर्तव्य ते आपण करितील. कदांश्चित दोनी सैन्ये येकत्रच व्हावयाचा विचार करिजेल तरी चिरंजीव स्वा * * * येतील, त्याचा परामर्ष करणार आपण (आ)हेत. आम्ही त्याहावे थैसे नाहीं. परंतु सूचनार्थ लिा आहे तो विचार स्वामीचे विचारे उतरेकडील मनसबियासारखा न जाला तरी त्यास आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करितील. विशेष काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*To Bajirao probably from Retrekar, asking news of Chimaji Retrekar.*

---

No. 51] [1729 ?

श्री

उपरी[+] रा। निलोबा येथे रात्री पावले. सांगून पाठविले वर्तमान ते कळले. यैसियास दयाबाहादुराचे लेक उजनीस आहेत ; त्याचे कासीद दिलीहून आले होते ते आम्हास येथे सापडले. त्याजपासी वकिलाचे कागद होते ते वाचून पाहिले. त्यात सविस्तर सैदाचे सुभेदारीचा व गिरधर बाहादुराच्या लेकाच्या सुभेदारीचा मजकूर लिहिला होता. *तुरेबाजखान तेथून निघाला (अस)ता तर खबर लिहिली असती. [पुढील किती ओळी गहाळ तें समजत नाहीं) सांगून पाठविली. उतम केले. तुम्ही आजचा दिवस बहुत सावधता करणे. आम्ही आज येथील निर्गम करून लस्करास येतो. हे आसीर्वाद. जनाजी सितोळे यास नारोपंतास सांगून जोट येक तीचौच्या रुपयाच्या किंमतीचा जामदारखानात असला तर देवणे हे आसीर्वाद.

¶*Niloba mentioned in the letter may be the Chitnis, son of Balaji Awji. Chimaji Appa writes this letter to some Sardar mentioning news from Delhi regarding Daya Bahadur and Girdhar Bahadur's sons' appointment to offices in Malwa.*

+ सबंध पत्र चिमाजी आपाच्या हातचें आहे.

No. 52] [1729 ?

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावियांसी:- सा.

 श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो धिराजी पवार दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाशी केला पाहिजे विशेष. सांप्रत गोसावियाकडून पत्र येऊन परामर्श होत नाहीं हे आपणास विहित नाहीं. आम्हास कितेक प्रकारें अवलंब गोसावियाचा आहे. ज्या रीतीनें पहिले सांभाल करीत आलां आहां त्यास उदासीनता केली. तथापि आश्रय आपलाच आहे. साह्यता प्रसंगीं आपणच करतील हा भरवंसा आहे. येंदा या प्रसंगात गोसावियानी आमचा बहुत अभिमान धरिला आण सातारा येतांच राजश्री स्वामीस आमचेविषई विनंती करणे ते केली. पुढें कितेक विचार कर्तव्य तों आपण याप्रांती येणार म्हणून स्थिर राहिला. त्यावर आम्हांस राजश्री ची आज्ञापत्रें व आपली पत्रें सादर जालीं कीं दर्शनास येणे. यैसियास आम्ही आपले आगमनाची मार्गप्रतीक्षा करीत असतां येणेहि जालें. याउपर आम्हांस काय आज्ञा ते करावी. तदनुरूप वर्तणूक केली जाईल. विशेष लिहिणे तर गोसावी सर्वज्ञ आहेत. हे विनंती.

मोर्तब सुद.

श्रीराजारामचरणीं
दृढभाव केरोजी
पवारराव.

¶[Dhiraji, son of Keroji Pawar of Nagar Devle, writes to Bajirao, requesting orders whether he should proceed to Satara.*

---

No. 53] [1729 ?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक जानकोजी सिंदे पाटील मौजे कोनेडखेड सा। कोरेगाव प्रा। वाई दंडवत विनंती विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम ता। छ १० मोहरमपावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित. स्वामीचे कृपेकरून समस्त सुखे असो. यानंतर चिरंजीव राजश्री राणोजी सिंदे याकडील वर्तमान काही कलत नाही. याकरिता स्वामीस विनंतीपत्र पाठविले. तरी

स्वामीनी त्याकडील संतोशाचे वर्तमान लेहून सेवकास सामाधान होये ते केले पाहिजे. लस्कर कोठे आले कोठे आहे, ते न कले. याकरिता सकल वर्तमान लेहावयास आज्ञा कीजे. आपण स्वामीच्या पत्राच्या उतराचा मार्ग चातकन्याये लक्षितो. सेवेसी सृत होये विज्ञापना.

¶*Jankoji Sinde, father of Ranoji, inquires of the Peshwa where and how his son was faring in the latter's entourage. This letter shows that Rānoji's aged father was living long enough to see his son rise to great eminence in life. The whole letter is in one hand, doubtless the writer's own, from which we may infer that ordinary Maratha gentlemen in those days could write very well.*

---

*No. 54*] [पो *1729 ?*

पा ल ३० गारवरं

श्री

विनंती उपरी. राजश्री उदाजी पवार याचे मजुमदार येथे होते त्यास आम्ही येणेप्रमाणे बोली सांगून त्याकडे पाठविले असेत.

पहिला सरंजाम जो आहे तो, जर आनंदराऊ समजाविला तर, अगदी करार करू. आनंदराऊ न समजला तर जलगाव नेवासे देणार नाही. जैनाबाद चिखलवाहाल बेल्हे इतके देऊ.

पंचविसा हजाराचे हवाले पथराची व रा ची (?) दाहाची वरात, दाहाचे कापड, येणेप्रा द्यावे.

हती पाच आहेत ते द्यावे.

याप्रमाणे आम्ही निर्वाह करावा. त्यानी राजश्री स्वामीस कागद पाठवावा जे प्रधानपंत आमचे बरे करीत नाही. सेनापतीपासूनहि होत नाही. आपण जिकडे पोट भरेल तिकडे जाऊ. येसी दोन तीन पत्रे राजश्रीस पाठवावी आणि सुरत प्रांतातून गुजरातेस जावे. सुरत प्रांतात जो येवज वसूल घेतील त्यापैकी दरसदे पस्तीस रुपये आम्हास द्यावे. गुजरातेत सवा लक्ष रुपये आम्हास द्यावे. मालव्याचा त्याचा वाटा आहे त्यास होलकराबरोबर पाचसे राऊत देऊन वाटा घ्यावा, येसी बोली सागून पाठविले आहेत. काये उतर येईल ते पाहावे. स्वामी आज्ञा करितील तैसी वर्तणूक करू. पूर्वी वासुदेव जोशाबरोबर पवार अंतस्ते बोली करून जात असले तर पाठवावे म्हणून निरोप आला होता, त्या आशयावरून हा मजकूर सांगून पाठविला आहे. आता आज्ञा येईल तैसी वर्तणूक करू हे विनती.

¶*Chimaji communicates to Bajirao terms of settlement with the Pawars of Dhar.*

1214

No. 55] [पो 1729

पा छ २० राखर.

श्री

विनंती उपरी. उदाजी आनंदराऊ उभयता समजले तर बरें. नाहीतर आनंदराऊ हती च्यार मागत नाही, येकच हती मागतो. पैका मागत नाही. जुना सरंजाम मालव्याचा वाटा दिल्हा म्हणजे चाकरी करितात. येसियास दाभाड्यासी कजिया करणे नाही. तेव्हा प्रयोजन पवाराचे आहेसे नाही, हे खरेच. परंतु मल्हारजी होळकराचे विचारे फार आग्रह आहे की दोघा भावासही पदरी घ्यावे. दोघांचे न बनेच तर आनदरायास तरी पदरी घ्यावे. फौज भारी होईल. मुलुकगिरी लांबपावेतो जाऊन करू. च्यार रुपये जाजती मिलतील येसे मल्हारबाचे विचारें आहे. बांडे पवार येक होऊन मालवा लुटितील येसा अर्थ मल्हारबाचे चितात आहे. विचारे पाहाता खराच आहे. हे विनंती. दुसरा येक विचार आम्ही आनंदरायास सांगून पाठविले जे, जर उदबा आमचे पदरी न राहिले तर जो सरजाम देखील मालवा आहे तो निमे तुम्हास देऊ, निमे तुकोजी पवारास देऊ. तुम्ही व तुकोजी पवार पहिल्याप्रमाणे चाकरी करणे म्हणजे तुकोजी पवाराची गुदस्ताची समजावीस अगदी उडते. परंतु हे गोस्ट आनंदरायाच्या चितास येत नाहीं. सविस्तर वृत कलावे म्हणून लिहिले असे. जर आनंदरायानी निमे तुकोजीस सरंजाम द्यावा येसे मान्य केले तर लक्ष प्रकारे दोघास पदरी राखावे हे उचित आहे हे विनंती.

¶*Chimaji proposes to Bajirao the arrangements to be effected with the Powars of Dhar. Udaji and Anandrao are brothers and Tukoji their cousin. Anandrao died in 1736. The letter is in Chimaji's hand, probably addressed to Bajirao. Perhaps this refers to the time when Chimaji with these Sardars was in Malwa.*

---

No. 56] [पो 10-10-1729 ?

पा छ २७ रावल.
संध्याकाल.

श्री

पुा अपत्ये चिमाजीने कृतानेक नमस्कार उपरी. येथील क्षेम ताा छ २६ राबिलोवल यथास्थित असे. पहिल्या तहनामियात पवारास मालवा तिजाई मोकासा होता त्याप्रमाणे आम्ही त्यास द्यावयास सिध आहो. येसे असता हाली

त्यानी निमे माळवा मोकासा द्यावा येसा आड घातला आहे. त्यास सुभेदाराचेहि विचारे त्यास निमे माळवा मोकासा द्यावा यैसे आहे. परतु आमचे विचारास हे गोस्ट येत नाही. परंतु सुभेदारादेखता आम्ही स्वामीस पत्र लिहिले आहे त्याचे उतर पस्ट येक स्वामीनी ल्याहावे जे तिजाई माळवा जो पहिले मुकासा आहे त्याप्रमाणे हाली देऊ, जाजती देत नाही. आणि हवाला अगर येक रुपया नख्त द्यावयासी मिळत नाही येसे ल्याहावे व पोकळ समाधानाच्या थोरपणाच्या गोष्टी ज्या लिहिणे त्या कागदात ल्याह्याव्या. परंतु कारभाराचा जाब पष्ट ल्याहावा. तो त्यास दाखऊ व स्वामीचे विचारे निमे माळवा कबूल करावा येसेच आले तर ते पत्र निरालेच आम्हास ल्याहावे. मग जैसा विचार बनेल तैसा करू. पैकियाची गोष्ट तो स्वामीनी मान्य केलीच आहे. परंतु त्यास दाखवावयाचे पत्र ल्याहाल त्यात येक रुपया द्यावयास अनकूळ पडत नाही येसे ल्याहावे. ये गोस्टीचा विचार तात्यास बोलाऊन करणे. विचार तो करून उतर पाठवावे. आमचे मते तिजाईपेक्षा जाजती मोकासा माळवा द्यावा येसे नाही. आम्ही तो निरोप द्यावयास सिध अहो. परतु स्वामीस लेहून उतर येईल त्यासारखा निरोप द्यावा अगर मुदा कबूल करावयाकरिता च्यार दिवस मोघम रायास लिहून जाब आणितो येसे म्हणून ठेविले आहेत हे विनती.

¶*All in Chimaji's own hand, addressed to Bajirao : refers to the division of the country with the Pawars of Dhar.*

---

*No. 57*] [*18-12-1730*

**श्री**

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलाचे शेवेसी

अपत्ये चिमाजीने साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ८ जमादिलाखर मोा नाा पाा बहाल वर्तमान येथास्तित आसे विशेष. पाा मेहूनबारे येथील गाडे व बैल संकराजी निकम याजकडे पाठविले आहेत. येणेप्रमाणे बितो.—

| गाडे सुमार | बैल सर | तरवारा |
|---|---|---|
| २ | ३४ | १ बिन परजी |
| बंदुखा सुमार | | ४ किता परजाचे |
| ७ | | |

येणेप्रमाणे निंबाजी सिंदा व पराणजी * * ला जासूद जाा येमाजी नाा याज बाा पाठविले आहेत. घेऊन पावलियाचे उतर पाठविले पाहिजे. याखेरीज

विठल निलकंठ याजकडे गाडा येक करार केला आहे. तो त्याजकडे माणूस पाठवून आणविला पाहिजे. बहुत[+] काये लिहिणे? कृपा केली पाहिजे. आज मेहूणबारे[१] येथून कूच करून बाहालेपासीं मुकाम केला. याउपरी मजल दर मजल जात असो. वरकड खानदेस प्रांतात कोठे घासदाणियाचा यैवज करार करू तो स्वामीकडे पावता होय यैसे करूं. स्वामीनी कर्जदारास यैवज दिहा (ल्हा) पाहिजे. गाडे बैल स्वामीपासी कोणी मागतील तर कोणास न द्यावें हे विनंती. सुभानजी भोकऱ्याबरोबर पत्रे पाठविली ती पावली. आणिकहि मागून स्वामीकडे पत्रें लेहून पाठऊ हे विनंती. येक गाडा बापूजी मेघशामाकडे दिल्हा पाहिजे हे विनंती.


¶*Letter from Chimaji to Bajirao from Khandesh on his way to the North.*

REFBK-0004479

+ Chimaji's own hand.

१ मेहुणबारें व बहाले तालुका, जि. खानदेश.

1217




G P. Z O. Poona, 1930